RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




रविवार, ०७ डिसेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २५८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 07 December 2025 | Year : 5 | Issue : 258 | Daily | Rate: Rs. 5/-

# मुंबई एअरपोर्टवर तुफान राडा

**मुंबई :** इंडिगोविमानसेवेचा सावळा गोंधळ अद्यापही सुरुच आहे. इंडिगोच्या गचाळ व्यवस्थापनाने गेल्या पाच दिवसांपासून प्रवाशांना प्रचंड त्रस्त करून सोडले आहे. विमान रद्द झाल्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी, निराशा आणि संतापाचे चित्र आहे. विमानतळावर काहींना भावना अनावर झाल्याचे दिसून आले. तर काहींना संताप अनावर झाल्याचे दिसले. मुंबईत विदेशी महिलेचा राग इतका वाढला की तिने थेट विमान कंपनीच्या काउंटरवर चढून थयथयाट केला. त्यातच आता आणखी एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्यात एका प्रवाशाची बॅगच मुंबईला आली नसल्याने तो तुफान राडा घालताना दिसतो.

इंडिगो विमानसेवेच्या गोंधळामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. एका प्रवाशाचा व्हिडीओ सध्या व्हायरल झाला आहे. त्यात तो प्रवाशी इंडिगोच्या काउंटरवर हात आपटताना दिसतोय. तो असेही सांगताना दिसतोय की, आम्ही गेल्या तीन दिवसांपासून बंगळुरूत अडकून पडलो होतो. जेवणाची, पाण्याची कसलीच सोय करण्यात आली नव्हती. अखेर आज आम्ही मुंबईत आलो. पण आमच्या बॅगा आलेल्याच नाहीत. आमच्या घराची चावी त्या बॅगेत आहे. आमचे पासपोर्ट त्या बॅगेत आहेत. आता आम्ही काय करायचे? असे जोरजोरात ओरडून हात काउंटरवर आपटताना आणि जाब विचारताना तो दिसत आहे.

## इंडिगोचे संकट सलग पाचव्या दिवशीही कायम



सलग पाचव्या दिवशी इंडिगोची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. शनिवारी दिल्लीहून निघणाऱ्या सुमारे 86 इंडिगोच्या उड्डाणे आज रद्द करण्यात आली आहेत, ज्यात 37 निर्गमन आणि 49 आगमन यांचा समावेश आहे. आज मुंबई विमानतळावरून 109 इंडिगोच्या उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत, ज्यात 51 आगमन आणि 58 निर्गमन यांचा समावेश आहे. अहमदाबादमध्ये, 19 इंडिगोच्या उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत, ज्यामध्ये 7 आगमन आणि 12 निर्गमन यांचा समावेश आहे. दरम्यान, तिरुवनंतपुरममध्ये 6 इंडिगोच्या उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

इंडिगोच्या सध्याच्या संकटानंतर इतर विमान कंपन्यांनी विक्रमी भाडेवाढ जाहीर केली आहे. ज्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या प्रवाशांमध्ये घबराट पसरली आहे.

## वाढत्या विमान भाड्यांवर सरकारची कडक कारवाई

इंडिगोच्या सध्याच्या संकटानंतर इतर विमान कंपन्यांनी विक्रमी भाडेवाढ जाहीर केली आहे. ज्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या प्रवाशांमध्ये घबराट पसरली आहे. विमान भाड्यात अचानक झालेल्या वाढीबाबत नागरी उड्डाण मंत्रालयाने आता कडक भूमिका घेतली आहे आणि सरकारने काही विमान कंपन्यांना वाढीव भाड्यांबाबत गंभीर सूचना दिल्या आहेत. याव्यतिरिक्त, प्रवाशांना जास्त भाडे देण्यापासून रोखण्यासाठी मंत्रालयाने भाडे मर्यादा लागू केल्या आहेत. सर्व विमान कंपन्यांना नवीन भाडे मर्यादांचे पालन करणे बंधनकारक आहे, जे परिस्थिती सामान्य होईपर्यंत लागू राहतील. या संकटकाळात, मंत्रालयाने विमान भाड्याचे रिअल-टाइम ट्रॅकिंग करण्याचा आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विमान कंपन्यांवर तात्काळ कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरी उड्डाण मंत्रालयाच्या या निर्णयामुळे आकाशाला भिडणाऱ्या विमान तिकिटांच्या किमती कमी होण्याची अपेक्षा आहे.

## नवविवाहित जोडपे व्हिडिओ कॉलद्वारे त्यांच्या रिसेप्शन पार्टीला उपस्थित



सोशल मीडियावर याच दरम्यान एक व्हिडीओ जोरदार व्हायरल झाला. ज्यामध्ये एक तरुण म्हणतो, माझे लग्न आहे, मी नवरदेव आहे, पण मी माझ्या स्वतःच्या लग्नालाच जाऊ शकत नाही. अशीच आणखी एक घटना देखील समोर आली आहे. कर्नाटकातील हुबळी येथील एका नवविवाहित जोडप्याला व्हिडिओ कॉलद्वारे त्यांच्या रिसेप्शन पार्टीला उपस्थित राहावे लागले. नववधू मेधा क्षीरसागर आणि नवरदेव संगम दास हे बंगळुरूहून हुबळी येथे रिसेप्शनसाठी येणार होते, परंतु 20 तास उशीर झाल्यानंतर फ्लाइट कॅन्सल करण्यात आली. अखेर 700 पाहुण्यांशी हे कपल ऑनलाइन कनेक्ट झाले. याच दरम्यान अनेक हृदयद्रावक घटना देखील समोर आल्या आहेत. अनेक लोक विमानतळावर अडकल्याने त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागला.

### ऑफिस सुटल्यानंतर 'नो कॉल, नो ईमेल'

# लोकसभेत 'राइट टू डिस्कनेक्ट' विधेयक सादर



**नवी दिल्ली :** 'वर्क लाइफ बॅलन्स' हा विषय हल्ली कळीचा बनला आहे. अनेक खासगी नोकरदार, तरूण कर्मचारी याबद्दल विविध माध्यमातून आपली मते व्यक्त करतात. कामाचे तास पूर्ण झाल्यानंतरही अनेकांना कामाशी संबंधित ईमेल, कॉल्स यांचे उत्तर द्यावे लागते. कर्मचाऱ्यांची यातून सुटका व्हावी आणि त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी गेल्या काही वर्षांपासून 'राइट टू डिस्कनेक्ट' अधिकाराची चर्चा होत आहे. शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यासंबंधीचे 'राइट टू डिस्कनेक्ट' विधेयक लोकसभेत मांडले. सरकारमध्ये नसलेले लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार महत्वाच्या विषयांवरचे विधेयक मांडू शकतात. सरकारने जर त्यावर विचार केला तर ते विधेयक स्वीकारलेही जाते. सुप्रिया सुळे यांनी मांडलेल्या विधेयकात म्हटले की, कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनातील ताण-तणाव कमी करण्यासाठी कर्मचाऱ्यांना डिस्कनेक्ट होण्याचा अधिकार मिळावा.

जगभरात डिजिटल क्रांती, माहिती-तंत्रज्ञान, इंटरनेट आणि स्मार्टफोनचा वेगाने प्रसार झाल्यानंतर कामाचे तास संपल्यानंतरही कर्मचाऱ्यांशी ई-मेल, मोबाइल किंवा मेसेजिंगद्वारे कामानंतरही संपर्क साधण्याची प्रवृत्ती कंपन्यांत वाढू लागली होती.




दिक्षाभूमी नागपूर येथे परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 69व्या महापरीनिर्वाण दिनी अभिवादनाला अनुयायांनी गर्दी करून त्यांचे स्मरण केले........

# साधुग्राम, तपोवन हवा पण भाजपाच्या बिल्डर मित्रांची दादागिरी नाही : आदित्य ठाकरे



**मुंबई :** नाशिकच्या तपोवन परिसरात तयार करण्यात येणाऱ्या साधूग्राममुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. साधू-महंतांच्या वास्तव्यासाठी सुमारे 1150 एकर क्षेत्रावर साधूग्राम उभारण्याचे नियोजन आहे, ज्यामध्ये तपोवनमधील 54 एकर महापालिकेच्या जागेचा समावेश आहे. मात्र याच जागेवरील सुमारे 1800 झाडे तोडण्याच्या नोटीसमुळे पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. याच दरम्यान आदित्य ठाकरे यांनी भाजपावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

तपोवनमध्येच का नेमका साधुग्राम? नाशिकवर खरेच प्रेम आहे का? नाशिक महानगरपालिका जर यांच्या हाती गेली, तर नाशिक विकायला काढतील, हे तर स्पष्ट आहे. धर्माचा पडदा आहे! साधुग्राम आम्हाला हवा आहे. तपोवन आम्हाला हवा आहे. पण भाजपच्या बिल्डर मित्रांची दादागिरी नाही! असे म्हणत निशाणा साधला आहे. आदित्य ठाकरे यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्वीट केले आहे.









# वैदिक हुकूमशाही विरुध्द ओबीसी संघर्ष होता आहे आणि असेल !



या पूर्वीचे लेखात आपण हे वाचले आहे की वैदिक ब्राम्हण हे ओबीसी सहित सर्व हिंदू समाजाला गुलाम म्हणून वागवित होते. सवर्ण सोडून आपण सर्वजण त्यांचे गुलाम होतो. त्यामुळे त्यांनी आपल्याला ज्ञान, शिक्षण, धर्म, ग्रंथ ज्ञान, धन संचय आणि शस्त्र इत्यादी बाळगण्याचा अधिकार, सत्ता संपादन करायचा अधिकार नाकारला होता. त्याचा परिणाम आपण अडाणी, गरीब, लाचार आणि सत्ताहिन आजही आहोत. दुसऱ्या शब्दात आपण सामाजिक, आर्थिक, राजकीय गुलाम किंवा मागास आहोत. आपले प्रतिनिधित्व आपल्याला मिळत नाही. या गुलामी विरुद्ध ओबीसी समाजाने संघर्ष केला होता हा इतिहास सांगतो. ओबीसी समाज लढणारा समाज आहे. परंतु तो हजारो जातीमध्ये विभाजित असून एक दुसऱ्याला उच आणि नीच मानतो. बुद्धिजीवी लोक अपवाद म्हणून सोडले तरी बहुसंख्य लोक भोळे आणि अज्ञानी आहेत. ते तर्क करू शकत नाहीत. त्यामुळे समाजातील विचारवंत लोकांपेक्षा ब्राम्हणांचा प्रभाव त्यांचेवर जास्त आहे. तसे जाळे वैदिकांनी त्यांचेवर टाकले आहे. तरीही त्यांनी केलेले विद्रोह लक्षणीय आहेत.

**महात्मा ज्योतिबा फुले ओबीसी होते :** महात्मा ज्योतिबा फुले हे ओबीसी माळी समाजात जन्माला आले होते. त्यांनी आधुनिक काळात वैदिक गुलामी विरुद्ध विद्रोह केला. त्या मार्गानेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेलेत. केवळ बौद्ध धम्म दीक्षा फुलेंना घेता आली नाही. त्याऐवजी त्यांनी सत्यशोधक धर्म स्थापन केला. तो बुद्ध धम्माची फुले कालीन आधुनिक आवृत्ती होती. डॉ. बाबासाहेब हे फुले यांच्यापेक्षा अधिक म्हणजे जागतिक अभ्यास करतात. फुले यांचेपेक्षा त्यांना अधिक शिक्षण आणि ज्ञान मिळविता आले तो बदलत्या काळाचा महिमा होता. त्यामुळे त्यांनी बौद्ध धम्म दीक्षा घेऊन ते जागतिक एका मोठ्या संख्येने असलेल्या बौद्ध समाजाचा घटक होऊन भारतीय वैदिक व्यवस्थेवर जागतिक दडपण आणण्यात यशस्वी होतात. सत्यशोधक धर्म स्थापन झाला पण टिकला नाही. हा अनुभव देखील डॉ. बाबासाहेबांचे पाठीशी होता. हाच काय तो फरक.

पण महात्मा फुले विचार हाच डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीचा पाया होता. महात्मा फुले यांनी ब्राम्हणी सत्तेचा पाया खिळखिळा केला. शिक्षण सुरू करून मनुस्मृतीवर हल्ला चढवला. अस्पृश्यता नाकारून ब्राम्हणी संस्कृतीला शह दिला. स्त्री शिक्षण आणि विधवा विवाहाने ब्राम्हणी हुकूमशाही खिळखिळी केली. त्यावेळच्या विद्रोहाचे तेच स्वरूप होते. हाच मोठा पुरावा आहे की ओबीसी लढवैया आहे.

**छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज :** हे दोघेही ओबीसी कुणबी होते. त्यांना शूद्र म्हणून ब्राम्हणांनी वैदिक संस्कार नाकारले होते. हाच मोठा पुरावा आहे की ते ओबीसी होते. शिवाजी महाराज मुघल आणि ब्राम्हण या दोघांचे सोबत लढतात. शाहू महाराज ब्राम्हणांचे विरुद्ध लढणारा राजा होता.

**संत नामदेव ओबीसी शिंपी :** वारकरी पंथ ही चळवळ धर्म चिकित्सा करणारी सामाजिक चळवळ होती. परंतु त्यांना त्यावेळी फार मोठ्या मर्यादा होत्या. म्हणून एका मर्यादेत राहून ते ब्राम्हणशाही विरुद्ध लढतात. परंतु तो ओबीसी समाजाने सुरू केलेला संघटीत लढा होता. संत नामदेव महाराज त्यांचे नेते आणि वैचारिक अधिष्ठान होते.

**संत तुकाराम महाराज ओबीसी सरसेनापती :** संत तुकाराम महाराज केवळ टाळकुटे नव्हते. ते 1891 ला जन्मास आले असते तर ते आंबेडकर असते आणि 1600साली आंबेडकर जन्मास आले असते तर ते तुकाराम असते. 1600 साली मुसलमान आणि ब्राम्हण तर 1900 साली ब्रिटिश आणि ब्राम्हण हे शत्रुस्थानी होते. वारकरी पंथ संत नामदेवानंतर संत तुकारामाचे नेतृत्वात शूद्र अतिशूद्र वर्णाचे स्वातंत्र्याचा लढा लढत होते. त्यांचा मार्ग, पद्धत, साधने त्यावेळे नुसार होती. ती आजचे सारखी नव्हती.

**कर्मयोगी गाडगेबाबा ओबीसी धोबी :** गाडगे बाबा one man army वाटत असली तरी त्यांना सहकार्य करणारे त्यांचे भक्त हे त्यांचे सैनिक होते. त्यांची शस्त्रे ही शब्दांची प्रखरता आणि सत्य हे होते.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज VJNT भाट होते :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक काळात सरसेनापती प्रमाणे डावपेच करीत ब्राम्हणी व्यवस्थे विरुद्ध लढत होते. त्यांची भजने आणि ग्रामगीता हे ब्राम्हणी व्यवस्थेवर आक्रमण होते.

**आजही ओबीसी लढेल :** या सर्वांचा विचार करता आज जी मोदी-शहा या राजगुंडाना समोर करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ रुपी ब्राम्हणी हुकूमशाही जी आज प्रस्थापित झाली त्या विरुद्ध ओबीसी लढल्याशिवाय राहणार नाही. आज जे लढत आहेत ते मास लेस व्यक्ती आहेत. पण एक दिवस ओबीसी मास त्यांच्या मागे लढण्यासाठी उभा राहील. हा संक्रमणाचा काळ आहे. त्यासाठी धीर धरावा लागेल. डॉ. आ. ह. साळुंके, नागेश चौधरी, डॉ. बाबुराव गुरव, धनाजी गुरव, डॉ. बाबा आढाव, प्रा. मा. म. देशमुख, प्रा. जैमिनी कडू, प्रा. एस. पी. विधले, अरविंद वानखेडे, बाळासाहेब गावंडे, दशरथ मडावी, राजाराम पाटील, कोळसे पाटील असे लाखाचे घरात नावे आहेत. परंतु तो लढा संघटित नाही. कारण त्यांचे मागे त्यांची जात उभी नाही. दलीत जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मागे उभे राहिले तसे ते नाहीत. दलीत अत्याचारग्रस्त होते म्हणून ते संघटित झाले. अन्यथा तेही झाले नसते. आज तेही पूर्ण संघटित नाहीत. लाखो संघटनेत विभाजित आहेत. हे वास्तव लक्षात घेतले तर ओबीसी वेळ आल्यावर लढताना दिसेल. त्यावेळी देशाचे चित्र बदलले दिसेल. म्हणून ओबीसी लढत नाही ही नैराश्याची भाषा बोलून रा.स्व.संघाला मदत करू नये ही काळजी सर्वांनी घ्यावी. ■ ■

लेखांक १३६



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

# झिबल्या आला रंगात



खूप दिवस झालेत एवढ्यात गावी काही गेलो नव्हतो. म्हणून सुट्टीचा दिवस नव्हता. पण... फेरफटका मारून यावा म्हणून सकाळीच आठवण झाली. काही महत्त्वाचे तसे कामही नव्हते. मग काय आपलीच गाडी आपलीच माडी अशा थाटात निघालो. गावाच्या दिशेने मध्येच मस्तपैकी अर्ध्यात गाडी थांबवली. भजी कडी व तरी चनावर ताव मारून थेट गावातच आता गाव नाही राहिलं नगरपंचायत झाली तहसीलचं ठिकाण पहिली भेट म्हणजे चहापाणी घेऊन घर गाटायचे म्हणून थांबलो ना एका टुमदार पान टपरीवर आधीसारखंच बसण्याच्या ठिकाण म्हणजे लाकडी पाटी लावलेली बसस्थान चेहऱ्यावर पाणी मारण्यासाठी दुप्पटा तोंडावरून काढला तोंड धुतलं आणि चेहरा पुसत पाठीवर बसलो व चहाचा ऑर्डर देतो तर काय समोर झिबल भाऊ कुणाशी तरी बोलत होता. म्हणून पुन्हा एक चहा मागविला म्हटलं दोन कट चहा द्या. तसा चहावाला पाहतच होता अरे हा एकटाच दोन कट मागतो. पण त्याला चहा देण्याशी मतलब. मी झिबल भाऊ च्या बाजूला बसलो त्याची नजर माझ्याकडे नव्हती तो आपल्याच तोऱ्यात त्याच्याशी बोलत होता. मी हळूच खांद्यावर हात ठेवला तसा तो दचकला मग मागे फिरून पहात अरे भाऊ.. बाप्पा कुठून दिवस निघाला गा. आणि काय खबर नाही असा अचानक येतस ना तर माझ्या जीवाले धस्स होते गा. कोण गेलं का? नाही तर. तू बारा गावचा पाटील माणूस तुझी भेट म्हणजे दुर्मिळच कधी गावात कधी शहरात तुझ्यासोबत भेट म्हणजे माझी सुखद पर्वणीच आज भेट म्हणजे खूपच योगायोग. तसा ज्या माणसाशी बोलत होता त्याला इशारा करून बोलला जा... तू... आता... कामाला लाग... एवढेच सांगून तो उठला व निघून गेला... झिबल भाऊ आता माझ्याकडे पाहत म्हणाला बरं कस येण केलस गा? आज काय काम नव्हतं का एऱ्या दिसी येत नाही.. शनिवार, रविवार पाहुनच येतस... आज अचानकच... काल आला असतास तं समजू शकलो असतो. पण... तुझं मतदान नाही,... गावात आहे अन सरपंचाची नव्हती ना... ही नगरसेवक नगराध्यक्षाची होती. बरं जाऊ दे तुझं कसं काय चाललंय माझं काय चालेल गा मी मस्त आहे. ‘आला वारा गेला वारा जो गाव बरा, तोच गाव खरा’. आता पाय काल नगरपरिषद ची निवडणूक होती लोकनेते पैसे वाटत होते. बोलीच लागली होती गा. घरचे मेंबर जेवढे, तेवढे पैसे घरातले बाहेरचे पकडून मेंबर सांगत. तेवढे पैसे मागत. जो नेता जोरदार तालुकदार तो काय कमी करते का? तो काय त्याच्या खिशातून देते का? त्यांनही याले त्याले लुबाडूनच दिला असेल ना मेहनतीच्या पैसा वाला देईल का? इमानदारीचा जमाना तरी राहिला का? भाऊ या जमान्यात तोंड पाहून ईळा अनं... जाऊ दे समोर नाही बोलत समजून घे. हेच दिवस राहते कमावण्याचे बाकी तर माहित आहे पाच वर्ष डोळ्याले सरपंच, नगरसेवक, नगराध्यक्ष, आमदार, खासदार दिसत नाही त्याच्या त्याच्या मौसम मध्येच दिसते. एकदा का ते सत्तेत आले की तोंडही दाखवत नाही. आम्ही हे करू, ते करू, असं करू, तसं करू म्हणून पोटाच्या बेंबीपासून तर नाकाच्या शेंडीपर्यंत बोंबलते पण एकदा का सार घडलं की जैसे थे. याच्या घरी जाताना लाज वाटते घरचे भेभावून धावते. भाऊ घरी नाही, दादा घरी नाही, साहेब घरी नाही, आताच आलास, सकाळीच आलास, एवढ्या रात्री आलास म्हणून हुलकावनी देते, बहाणे सांगते. जसा काही याले साऱ्या दुनियेचे काम करण्यासाठी दौरे चालू राहते. आणि जाते कोटी त कोणी बोलावलं काल्यात, मंदिरात, हरिपाठात, स्मशानात कारण मानपान मिळते ना. काम काहीच नाही पाच वर्षांत झकमारी करीत फिरते मग सरकारी मिळणाऱ्या मानधनातून उद्घाटन करते एका एका दिवशी चार चार ठिकाणी रोड, नाल्याचे बांधकामाचे टेंडर काढून ते टेंडर त्याच्या भावाच्या बहिणीच्या नातेवाईकाच्या नावाने सारे पोटभरू नेते. साले ने. ते. बापरे भाऊ खरंच आहे. कठीण आहे. अगा भाऊ हे काहीच नाही. याहूनही परिस्थिती वेगळी आहे यात आम्ही मतदार म्हणून काही कमी नाही. आम्हीही लाचखोर हरामखोर, भ्रष्टचोर, गुन्हेगार, गुंडा-मवाली, जोरादाखवणाऱ्याच्या पाठीशी राहतो, घाबरतो. त्यांची गुलामी, हाजीहाजी करीत मागे पुढे धावतो. म्हणून ते मस्तवाल मस्तावले. आणि त्याला आम्हीच नेता म्हणून पुढे करतो. अशाच लोकांच्या हाती सत्ता देतो. मग खरा गुन्हेगार कोण? झिबल भाऊ बरोबर आहे आज पोटतिडकीने बोलत आहेस असं घडलं तरी काय? ‘भाऊ येड गावातून पेडगावला जातस का गा. तू माझ्यापेक्षा हुशार माणूस मी अडाणी’ ‘माझ्या जात्यात दाणे टाकून मलेच दळण कर म्हणतस का गा’ तसं नाही भाऊ आतापर्यंत भेटी झाल्यात तू जे काही बोलत होतास ते खरंच तुझ्याकडून खूप घेण्यासारखे शिकण्यासारखे आहे. पण आज तू बोलतोस ना ते मन भारावून जावं व रोमांचक उभं करणारच आहे. काहीही नको गा बोलू जे खरं आहे तेच बोलतो. उगाच राईले पर्वत नको करू. काल जे या डोळ्याने पाहिलं या कानानी ऐकलं तेच सांगून राहिलो. या महाराष्ट्रात असं काही घडलं असं काय वाटलं नव्हतं हा महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा शिवा, शाहू, फुले, आंबेडकरांचा या महाराष्ट्राची भूमी संत साहित्य कवींची याच महाराष्ट्रात असे घडावे तेव्हा विचार येते मी कुठे राहत आहे? निवडणुकीत हार-जीत मान्य आहे. पण जिंकण्यासाठी ही नीच प्रवृत्ती, हलकट मनोवृत्ती, बालिश चाळे, जोर जबरदस्ती, हाणामारी हुसकावणी, फूसलावणी कस कस हे सार पहावे लागते. बापरे खूपच वाईट आहे तर. मग आपणच का? का म्हणून मागे राहायचं तुला सांगतो जसे लोक तसा भेस करू तरच पोटभरण नाहीतर जिवाणीसी मरणानं मरावं लागेल. म्हणून मी ठरवलं. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत, आमदार, खासदार किंवा कोणतीही निवडणूक येऊ दे जेवढे उमेदवार तेवढ्याकडून येईल ते लुटायचं आणि एका प्रामाणिक इमानदार शिक्षित संस्कारी निर्व्यसनी समाजहिताचे काम करणाऱ्या माणसालाच मतदान करायचं. मग तो जिंको किंवा हरो एकदा हे पाऊल उचलून तर पाहू. बघू नवक्रांतीची सुरुवात करून पाहू पुढच्या पुढे. ■ ■



रंगराज गोस्वामी
मो.9970995657

# मा. सो. कांबळे लिखित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र




राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र म्हणजे सामाजिक, आर्थिक, राजकीय हक्क आणि मानवी मूल्ये प्रस्थापित करण्याच्या अखंड क्रांतिकारक संघर्षाची गाथा होय. त्यांचे जीवन झंझावातासारखे वादळी, रोमहर्षक आणि मानवतेला सतत प्रेरणा देणारे होते. त्यांच्या चरित्रकथेत असंख्य नाट्यमय घटना असल्यामुळे आंबेडकरांचा जीवनप्रवास रेखाटण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात झालेला आढळतो. मारुती सोमाजी कांबळे यांनीसुद्धा 15 डिसेंबर 1957 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र लिहून प्रसिद्ध केले. त्यांच्या या चरित्रग्रंथाचे शीर्षक ‘दलितांचा हिरा’ असे अत्यंत लक्षवेधी आहे. ‘1945 साली रात्री बाबासाहेब माझ्या स्वप्नात आले आणि माझ्या मस्तकावर हात फिरवीत मला एक वाक्य म्हणाले; त्याच दिवशी मी त्यांच्या चरित्रलेखनाची प्रतिज्ञा केली,’ असे कांबळे नमूद करतात. स्वप्नातील या दृष्टांतावरून कांबळे डॉ. बाबासाहेबांकडे कोणत्या भावदृष्टिकोनातून पाहत होते, हे लक्षात येते. मा. सो. कांबळे यांनी हे चरित्र डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर काही महिन्यांत पूर्ण केले. त्या काळात आंबेडकरांच्या चरित्रविषयक साधनसामग्रीची मुबलकता नव्हती. त्यामुळे या चरित्रात जनश्रुती, सांगोवांगी आणि कथनांवर अधिक भर देण्यात आला आहे. कवलापूर या आपल्या मूळ गावी कांबळे यांनी बालपणी गावातील बुजुर्गांकडून डॉ. बाबासाहेबांविषयी ऐकलेल्या कथा व आठवणी मनात साठवून ठेवल्या होत्या. गावचेच तमासगीर बंधू शिवा-संभा आणि कवी भाऊ फक्कड हे डॉ. बाबासाहेबांशी परिचित असल्याने, ते गावाला आले की त्यांच्या चर्चेमुळे कांबळे यांची माहिती समृद्ध होत गेली. नंतर विविध स्त्रोतांमधून मिळालेली माहिती एकत्रित करून ‘दलितांचा हिरा’ या चरित्राचे सर्जन झाले. या चरित्राची सहावी आवृत्ती 2009 मध्ये प्रकाशित झाली. या आवृत्तीला आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आणि नामवंत साहित्यिक राजा ढाले यांची प्रस्तावना लाभली आहे. या सविस्तर प्रस्तावनेत ते ‘दलितांचा हिरा’ हे मराठीतील पहिले परिपूर्ण आंबेडकर चरित्र असल्याचे नमूद करतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, ‘डिसेंबर 1956 पर्यंत डॉ. आंबेडकरांचे समग्र चरित्र लिहिले गेले नव्हते. कारण, त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस झालेली बौद्ध धम्मदीक्षा ही अत्यंत क्रांतिकारक घटना त्यांच्या जिवंतपणी प्रकाशित झालेल्या सर्व चरित्रांत अपूर्ण राहिली.’ या पार्श्वभूमीवर 15 डिसेंबर 1957 रोजी प्रकाशित ‘दलितांचा हिरा’ हे पहिले परिपूर्ण चरित्र असल्याचा दावा ढाले करतात. मात्र हा दावा वस्तुतः तंतोतंत योग्य नाही. कारण जानेवारी 1957 मध्येच डॉ. बाबासाहेबांच्या जन्मापासून महापरिनिर्वाणापर्यंतचा जीवनालेख मांडणारी तीन महत्त्वाची चरित्रे प्रकाशित झाली होती. मुंबईचे शांताराम पाटील यांनी ‘दलितांचे बाबा’, तर नागपूरचे दुर्जन शेंडे यांनी ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर - निर्वाणरहस्य’ ही चरित्रे प्रसिद्ध केली. या चरित्रांत जन्म, बालपण, शिक्षण, अस्पृश्योद्धार, राजकीय कार्य, धम्मदीक्षा, महापरिनिर्वाण आणि शोकसंदेश या सर्व गोष्टी समाविष्ट आहेत. पाटील यांच्या चरित्राला धनुर्धारीचे संपादक अ. सी. केळूसकर यांचे प्रास्ताविक आहे. शेंडेंच्या चरित्रात धम्मदीक्षेच्या आणि महापरिनिर्वाणाच्या श्याम-श्वेत छायाचित्रांचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेबांच्या निधनानंतर अवघ्या महिना-दीड महिन्यात ही दोनही चरित्रे प्रकाशित झाली होती. याशिवाय पुण्याचे ए. के. घोरपडे यांनी ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर - चरित्र व कार्य’ हा 128 पृष्ठांचा चरित्रग्रंथ लिहिला आहे. यात अस्पृश्यता, शूर जमात, अस्पृश्योद्धाराचे प्रयत्न, पूर्वपीठिका, बालपण तसेच धम्मदीक्षा आणि ‘बाबा गेले!’ अशी प्रकरणेही समाविष्ट आहेत. हा ग्रंथदेखील 1957 मध्येच प्रथम प्रकाशित झाला. या सर्वांवरून मा. सो. कांबळे लिखित ‘दलितांचा हिरा’ हे मराठीतील पहिले परिपूर्ण आंबेडकर चरित्र असल्याचा दावा ग्राह्य धरता येत नाही. या चरित्रात अनेक कालविपर्यासांच्या चुका आढळतात; परंतु विस्तारभयास्तव त्यांचा येथे उल्लेख केलेला नाही. भीमरावांचे मूळ आडनाव आंबावडेकर ते आंबेडकर कसे झाले, याबद्दल डॉ. बाबासाहेबांनी स्वतः ‘नवयुग’ (13 एप्रिल 1947) च्या विशेषांकात सविस्तर लिहिले आहे. आंबेडकर गुरुजींनी भीमरावांना आपले आडनाव दिले, ही घटना साताऱ्यातील असून, कांबळे यांनी ती चुकीने दापोली येथे दाखविली आहे (पृष्ठ 10). तसेच भीमरावांचा रमाबाईशी विवाह रामजी सुभेदारांनी ठरविला होता; परंतु कांबळे एक कल्पित कथा देतात- दापोलीच्या बाजारपेठेत आंबेडकर आणि रमाबाई यांची अचानक भेट झाली व त्यावरून विवाह ठरला (पृष्ठ 19). ही कथा वस्तुस्थितीविरुद्ध असून चरित्रलेखनातील ‘सत्यपूर्ण व्यक्तिदर्शन’ या मूलतत्त्वास धक्का देणारी आहे. गांधींच्या निधनाबाबतही अशीच एक कल्पित कथा त्यांनी घुसडली आहे. रामजी सुभेदारांनी साताऱ्यात महार, मांग, चांभार, ढोर विद्यार्थ्यांना सातवीच्या परीक्षेसाठी मोफत राहण्याची व जेवणाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी जाहिरात दिली होती. त्या आधारे चंद्रसेन बळी कांबळे (रा. खेड, ता. वाळवा) यांच्यासोबत घडलेली हकिकत अत्यंत प्रभावी आणि रामजींच्या सेवावृत्तीचे दर्शन घडवणारी आहे. त्यांच्या गाठोड्यातील सुक्या भाकऱ्या पाहून सुभेदारांनी त्या गायीला खाऊ घातल्या आणि त्यांची पूर्ण जबाबदारी घेतली. ही हकिकत चंद्रसेन यांनी स्वतः मा. सो. कांबळे यांना सांगितली. या पुराव्याच्या आधारे रामजींच्या चरित्राचे प्रभावी रेखाटन झाल्याचे विशेषत्वाने जाणवते. मनुस्मृती जाळण्यामागील कारणांची थोडक्यात दिलेली कारणमीमांसा (पृष्ठ 38-39)ही या चरित्राचे एक वैशिष्ट्य आहे. 105 पृष्ठांच्या या चरित्राचा शेवट अत्यंत हृदयद्रावक आणि कारुण्यपूर्ण असा केला असून, शोकात्मक वातावरण निर्मितीत कांबळे यांची शैली यशस्वी ठरली आहे. मराठीतील पहिले ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी या ग्रंथाला दिलेला अभिप्राय लक्षणीय आहे :– ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील मुख्य प्रसंग धावत्या शैलीने, सुसूत्र वर्णन करून कांबळे यांनी आपल्या इच्छेला मूर्तस्वरूप दिले आहे. चटकदार पोटमथळे आणि सोप्या भाषेला साहित्यगुणात गोविले आहे. धगधगत्या स्थंडिलावर मा. सो. कांबळे यांनी आपली पणती लावून घेतली आहे.’ ■ ■

आधारभूत ग्रंथ : कांबळे मा. सो. दलितांचा हिरा, सहावी आवृत्ती - 2009.
प्रमोदराजे आनंदराव पठाणे, चेंबूर, मुंबई.



प्रा. डॉ. सत्यजित सूर्यवंशी
मो. 7775008700

प्रा. डॉ. सत्यजित सूर्यवंशी
एस.सी.एस. गर्ल्स कॉलेज, पाचपावली, नागपूर
संपर्क : 7775008700

# आम्हीही इतिहास घडविला
## शब्दात साकारलेल्या आंबेडकरवादी महिलांच्या शौर्यगाथा




ज्येष्ठ लेखिका उर्मिला पवार आणि संशोधक मीनाक्षी मून यांनी संयुक्तपणे लिहिलेले ‘आम्हीही इतिहास घडविला’ हे पुस्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या चळवळीत दलित स्त्रियांनी निभावलेल्या बहुआयामी भूमिकेचा विस्ताराने वेध घेणारे एक मोलाचे ऐतिहासिक दस्तऐवज आहे. इतिहासाच्या मुख्य प्रवाहाने नेहमीच उपेक्षित ठेवलेल्या आंबेडकरी महिलांच्या संघर्षांना, कृतींना व वैचारिक प्रवाहाला हे पुस्तक प्रथमच ठोस जागा उपलब्ध करून देते.

पुस्तकाची रचना व वैशिष्ट्ये :-

हे पुस्तक दोन प्रमुख भागांत विभागलेले आहे.

**1) आंबेडकरी चळवळीचा ऐतिहासिक पट :-** पहिल्या भागात अस्पृश्यतेविरुद्धचा लढा, धार्मिक-सामाजिक शोषणाला दिलेले आव्हान, राजकीय जाणिवांची जागृती आणि स्त्रियांचा आरंभीचा सहभाग या सर्वांचा सखोल आढावा आहे. अनेक महत्त्वाचे ऐतिहासिक संदर्भ, पुरावे, वृत्तपत्रीय नोंदी यांद्वारे हा भाग अत्यंत तथ्यपूर्ण झाला आहे.

**2) कार्यकर्त्या महिलांच्या मुलाखती व आत्मकथने :-** दुसऱ्या भागात 1930 च्या दशकातील अनेक दलित महिला कार्यकर्त्यांच्या दुर्मिळ मुलाखती आहेत. हा भाग विशेष मौल्यवान आहे. कारण यातून त्या काळातील स्त्रियांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी कसे प्रेरित होऊन प्रत्यक्ष काम केले, धैर्याने कसे उभे राहिले, याचा थेट इतिहास नोंदवला आहे.

**डॉ. आंबेडकरांचा स्त्री-विषयक दृष्टिकोन :-** उर्मिला पवार मांडतात की, डॉ. आंबेडकरांनी विस्मृतीत गेलेल्या अनेक महापुरुषांचे कार्य उजेडात आणले. बुद्ध, फुले, कबीर या तत्त्वज्ञानांच्या स्त्रोतांशी दलित समाजाची नव्याने ओळख करून देत त्यांनी सामाजिक परिवर्तनाला वेग दिला. या प्रवाहात स्त्रियांनीही अत्यंत खंबीरपणे योगदान दिले. ही गोष्ट हे पुस्तक ठळकपणे अधोरेखित करते.

**अस्पृश्य स्त्रियांच्या इतिहासाचा शोध :-** भारतीय इतिहासात दलित स्त्रीचे अस्तित्व पद्धतशीरपणे नाकारले गेले. परिणामी तिच्या पराक्रमाची नोंद इतिहासात क्वचितच सापडते. सोयराबाईसारख्या संतपरंपरेतील स्त्रियांनी अस्पृश्यतेच्या अन्यायाविरुद्ध कसा आवाज उठवला, हे लेखिका दाखवून देतात.

**महत्वाचे ऐतिहासिक संदर्भ :-** पुस्तकात अनेक महत्त्वाच्या व्यक्ती आणि चळवळींची माहिती दिली आहे गोपाळबाबा वलंगकर यांनी 1886 मध्ये ‘विटाळ-विध्वंसन’ लिहून अस्पृश्यता निर्मूलनाचा पाया रचला.

शिवराम जानबा कांबळे, विठ्ठल रामजी शिंदे, कालीचरण नंदा गवळी, जाईबाई चौधरी यांनी शिक्षण, संघटन व सुधारणा याबद्दल केलेले कार्य. 1913 मध्ये तुळसाबाई बनसोडे या अंत्यत समाज कमिटीच्या महिला सदस्य. आंतरजातीय विवाहांना दिलेला डॉ. आंबेडकरांचा पाठिंबा. जनता साप्ताहिकातील मिश्रविवाहांच्या बातम्या. ही सर्व तथ्ये स्त्रियांचा सहभाग किती व्यापक होता हे स्पष्ट करतात.

**महिला संघटनांचा उदय आणि प्रभाव :-** 1928 ते 1947 या काळात स्त्रियांनी अनेक संघटना स्थापन केल्या :- रमाबाई आंबेडकर महिला मंडळ, प्रांतिक महिला संघ, अखिल भारतीय दलित महिला परिषद (1942) - सुमारे 35,000 महिलांची उपस्थिती, शेड्युल्ड कास्ट फेडरेशनमध्ये महिलांचे नेतृत्व, हिंदू कोड बिलाला स्त्रियांनी दिलेला पाठिंबा, यातून दलित स्त्रियांनी केवळ सामाजिक सुधारणा नव्हे तर राजकीय नेतृत्वही स्वीकारले होते.

अतिशय महत्त्वपूर्ण कार्यकर्त्या :- पुस्तकात इतिहास घडवणाऱ्या शेकडो स्त्रियांची नावे नमूद आहेत. त्यापैकी काही प्रमुख :-

राधाबाई कांबळे - गिरणी कामगारांच्या मोर्चाचे नेतृत्व, जाईबाई चौधरी - कन्या शाळेची निर्मिती, कवयित्री - सुलोचनाबाई डोंगरे, अंजनीबाई देशभ्रतार, तुळसाबाई बनसोडे, वीरेंद्राबाई तीर्थंकर, इंदिराबाई पाटील, कीर्तीबाई पाटील, भिक्षुनी नंदशिला, भिक्षुनी चंद्रशीला, मीराबाई पगारे, संघमित्र इत्यादी. या सर्व महिला त्या काळातील चळवळीचा कणा होत्या.

**डॉ. आंबेडकरांचा रमाबाईवरील श्रद्धांजलीभाव :-** ‘थॉट्स ऑन पाकिस्तान’च्या अर्पणपत्रिकेत डॉ. आंबेडकरांनी रमाबाईंच्या सहनशीलतेचे स्मरण केलेले वर्णन अतिशय हृदयस्पर्शी आहे. चळवळीच्या कठीण काळात त्यांनी दाखवलेले त्याग व धैर्य ऐतिहासिक आहेत.

**आजच्या काळाशी नाते :-** लेखिका स्पष्ट करतात की आजही संघर्ष कमी झालेला नाही. शहरी व ग्रामीण दलित स्त्रियांतली दरी अद्याप आहे. आंबेडकरी राजकारण दिशाहीन होताना दिसते.

डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते, ‘मी महिलांच्या संघटनांवर विश्वास ठेवणारा माणूस आहे.’ त्यामुळे पुढील पिढ्यांनी एकत्र येऊन, परस्परांना आधार देत सामाजिक न्यायासाठीच्या लढ्याला नवे बळ द्यायला हवे. ‘आम्हीही इतिहास घडविला’ हे पुस्तक आंबेडकरी स्त्रियांच्या अदृश्य इतिहासावर प्रकाश टाकते, सामाजिक शोषणाची मुळे उघडी करते, प्रेरक संघर्षकथा पुढील पिढ्यांसमोर ठेवते आणि न्याय, समता व स्वाभिमानासाठी लढण्याची प्रेरणा देते. हे पुस्तक इतिहासाचे पुनर्वाचन घडवून आणत, वर्तमान आणि भविष्यातील स्त्री-आंदोलनांना दिशा देणारे आहे. ■ ■



सरिता सातारडे
मो. 8308853051

# स्मृतिशेष शशीकलाताई धाबर्डे



आंबेडकरी चळवळीतील ख्यातकीर्त व्यक्तिमत्व म्हणजे घनश्याम धाबर्डे! कोणतेही आंबेडकरी संघटन असो, त्यांना एकत्रित ठेवण्यासाठी धडपडणारे, धम्मकार्यात सतत अग्रेसर असणारे प्रा. घनश्याम धाबर्डे हे बहुतेकांना सुपरिचित आहेत. सामाजिक कार्यामुळे धाबर्डे सरांचा पूर्वीपासून एक पाय घरात तर दुसरा बाहेर राहिला आहे. परंतु त्यांच्या सहचारिणी शशीकला धाबर्डे यांनी त्याबद्दल कधीही कांगावा केला नाही. उलट घरसंसार, नातेवाईकांचा सांभाळ करण्यात त्यांनी धन्यता मानली. जीवन प्रवासातील प्रत्येक कठीण प्रसंगात त्या संघर्षशील असायच्या. त्यामुळे ‘प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते’ ही म्हण घनश्याम धाबर्डे यांच्या जीवनात तंतोतंत लागू पडते. शशीकलाताईंचे वडील चंद्रपूरचे कृष्णराव खरे (पूर्वाश्रमीचे खोब्रागडे आणि बॅरि. खोब्रागडे परिवारातील प्रमुख) हे वामनराव गोडबोले यांच्या चळवळीत सक्रिय कार्यकर्ते होते. अर्थात शशीताईस समाजकार्याचे बाळकडू घरातूनच मिळाले. यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे त्या ‘भारतीय बौद्ध महासभे’च्या पदाधिकारी होत्या. कार्यकर्त्यांच्या भोजनाची व्यवस्था असो वा अन्य संघटात्मक कार्य, त्यातील शशीताईंचा सहभाग ठळकपणे जाणवायचा. मुलगा सिद्धार्थ व मुलगी प्रेरणा ही अपत्ये अशा सामाजिक वारसा असलेल्या संस्कारात मोठे झालीत. जावई डॉ. महेंद्र कांबळे आज कौटुंबिक भाग असून मुलगी पॅथॉलॉजीस्ट म्हणून कार्यरत आहे. मनाची विनम्रता, दुःखीकष्टी लोकांप्रती करुणा, सहानुभूती आणि आपुलकीची वागणूक या गुणांमुळे त्या सर्वांच्या गळ्यातील ताईत बनल्या होत्या. घरातील मुस्लिम धर्मीय मोलकरीणला सुद्धा त्या स्वतःच्या कुटुंबाचा सदस्य समजत असत. या मोलकरीणच्या मुलीच्या लग्नात त्यांनी किराणा, धान्य ई. चे आर्थिक सहाय्य करून त्यांच्या सुखदुःखाच्या साथीदार बनल्या होत्या. अर्थात बुद्धांची करुणा, मैत्री, बंधुतेच्या आचरणातून त्या धम्मजीवन जगत होत्या. त्या कुणाच्या भावना न दुखवता स्पष्टपणा जोपासत होत्या. हा आदर्श विवाहित महिलांसाठी एक दिशादर्शक आहे. मनाने निर्धारी, शांत आणि सम्यक वाणी असणाऱ्या शशीकलाताईंना मात्र 2023 मध्ये कॅन्सर या दूर्धर आजाराने ग्रासले. त्यामुळे त्यांना वेळोवेळी दवाखान्याची वाट धरावी लागली. ॲडमिट असता भेटणाऱ्यांना त्या आपण आजारी असल्याचे कधी जाणवू देत नसत. भेटायला येणाऱ्यांशी आदराने आणि हसतमुखाने बोलायच्या. सकारात्मक दृष्टीकोन आणि निर्धारी स्वभावामुळे त्यानी आजारावर मात सुद्धा केली. आजारातून बाहेर येताच त्या धम्मसंगोष्टी, सम्यक संकल्प संघाच्या सभांना उपस्थित राहू लागल्या. धम्मसंगोष्टीद्वारे काटोल रोड वरील बुद्धवन येथे धम्मसभा आयोजित केली होती. या सभेत नवजीवन प्राप्त शशीताईंचा सत्कार घडवून आणला होता. प्रवासातील त्यांचे सर्वांशी हसतखेळत वागणे, धम्मसंगोष्टीच्या सभासदांच्या आजही स्मरणात आहे. धाबर्डे सर त्यांना गंमतीने म्हणायचे शशी तुझ्या पूर्वीच मी या जगाचा निरोप घेणार आहे. त्यावर त्या म्हणायच्या तुमची समाजाला गरज आहे, त्यामुळे तुम्ही नव्हे मीच प्रथम जाणार आहे. यावेळी त्यांनी आपला शब्द खरा करून दाखवला. 7 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 7 वाजता प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले. त्याठिकाणी 9 वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. धाबर्डे सरांच्या जीवनातील 7/12 (7 डिसेंबर) कोरा करून गेल्या. मृत्यूपूर्वी शशीताईंनी आणि धाबर्डे सरांनी दोघांच्याही देहदानाचे संकल्पपत्र भरून दिले होते. त्यांच्या इच्छेनुसार धाबर्डे सरांनी शशीताईंचे डोळे महात्मे नेत्र पिढीला आणि देहदान GMC ला दान करून शशीताईंची दानपारमिता आणि संकल्प पूर्णत्वास नेला. शशिताईंचे मौन योगदान, त्याग, मनाचा मोठेपणा या सर्व बाबी प्रा. घनश्याम धाबर्डे यांच्या कार्यास दृढ आधार ठरल्या आहेत. नेत्रदान व देहदानाच्या माध्यमातून शशीताई आजही आमच्यात आहे. शशीताईंच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त विनम्र अभिवादन!! ■ ■



श्रीराम बनसोड,
8208617748

# मित्रजन सोसायटीची शंभर टक्के वसुली

**शेयर, ठेवी, चालू खाती त्यानंतर कर्ज वाटप आणि कर्ज वसुली ही पंचतत्व सहकार क्षेत्रातील आहेत. कर्ज वसुली ही पतसंस्था आणि बँक क्षेत्रातील फार महत्वाची बाब आहे. सहकार क्षेत्रात ज्यांना पाया ठेवला असेल त्यांनी सतत आपल्या संस्थेच्या संदर्भात जागरूक नागरिक म्हणून कार्य करावे. सोबत आर्थिक व्यवहारात काटेकोर नियमाचे पालन केले पाहिजे. गरजू लोकांना कर्ज देणे हे सहकार क्षेत्रातील प्रमुख तत्त्व आहे.**




आपल्याकडे पैसा आहे तो जर इतर ठिकाणी गुंतविला तरच पैशाच्या अनेक पैसे होती. साठवणुकीसाठी पैसा नसतो ते चलन आहे. काही आर्थिक अभ्यासक म्हणतात. पैश्याला पाय असतात. तो चालतो म्हणून चलन आहे. देणे घेणे झालेच पाहिजे. दिले तर घेतले पाहिजे. कर्ज वसुली झाली पाहिजे. वसुलीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कर्ज वसुली सतत झालीच पाहिजे तर पतसंस्था भरभराटीला येऊ शकतात. शंभर टक्के कर्ज वसूल करून मित्रजन महिला सोसायटी लष्करीबाग नागपूर प्रत्यक्ष अनुभवातून करून दाखविले आहे. ही अभिमानाची बाब आहे.

मित्रजन महिला नागरी सहकारी पत संस्था मर्यादित नागपूर यांनी मिशन : 0टक्के NPA मिशन राबविले आणि यश मिळविले. हे सर्व शक्य झाले सोसायटीच्या टीम वर्क मधून होय. नोव्हेंबर 2025 महिन्यात रक्कम रू. 9,09,330/-ची कर्ज वसुली केली आहे. ही छोटी रक्कम असली तरी ही एका संस्थेने केलेली मोठी प्रगती म्हणता येईल. हे जास्त महत्वाचे आहे.

सक्रिय कर्ज वसुली टिम मध्ये मंजुषा मेश्राम अध्यक्ष, सागर मेश्राम मुख्य कार्यकारी अधिकारी, स्वाती पिल्लेवान, प्रमोद चिंचखेडे वसुली अधिकारी, मोहीत चिंचखेडे वसुली अधिकारी, पुनम बन्सोड वसुली अधिकारी, मिलिंद नारखेडे हसुली अधिकारी, प्रकाश जाधव वसुली सल्लागार यांचा सक्रीय सहभाग होता. उत्तर नागपूरसारख्या आर्थिक दृष्टीने मागासवर्गीय असलेल्या भागात 100 टक्के कर्ज वसुली करून नवा उच्चांक गाठला आहे. भारतीय सहकारी कायदा 1912 नुसार, 'सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे 'सहकारी संस्था' होय.' सहकार हे लोकांचे संघटन आहे, भांडवलदारांचे नाही. येथे सदस्य स्वेच्छेने एकत्र येतात. प्रत्येक सदस्याला समान अधिकार असतो.

सभासद लोकशाही पद्धतीने संस्थेचे नियंत्रण करतात. त्यामुळे पारदर्शकता दिसते. सभासदांच्या व्यवहाराच्या प्रमाणात त्यांना लाभांश मिळतो. खरे तर सभासदांच्या सामाजिक आणि आर्थिक गरजा पूर्ण करणे हा मुख्य उद्देश असतो. त्यामुळे सर्व सभासदांची संस्था असते तर सभासद लोकशाही मार्गाने संचालक मंडळ निवडतात. सहकारी बँक ही एक वित्तीय संस्था आहे, जी तिच्या सभासदांच्या मालकीची असते आणि सहकाराच्या तत्त्वावर चालते. या बँका त्यांच्या सदस्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी बचत आणि कर्ज यांसारख्या सेवा देतात. या बँका भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) आणि राज्य सहकारी कायद्यांतर्गत नियंत्रित केल्या जातात.

सहकारी बँक ही तिच्या सभासदांच्या मालकीची असते. 'एक व्यक्ती, एक मत' या तत्त्वाचे पालन केले जाते. शहरी आणि ग्रामीण भागातील लहान व्यवसाय आणि समुदायांना बँकिंग सेवा पुरवणे हा असतो. बँका बचत खाती, कर्ज, ठेवी आणि इतर आर्थिक उत्पादने व सेवा पुरवतात. सहकारी बँकांचे नियमन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) आणि संबंधित राज्य सहकारी कायद्यांतर्गत होते.

नागरी सहकारी बँका (urban Cooperative Banks), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, आणि राज्य सहकारी बँका असे प्रकार असतात. सहकारी बँका स्थानिक समुदायाच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक लक्ष केंद्रित केल्या जाते. सभासद हे बँकचे मालक असल्याने त्यांना सेवांमध्ये प्राधान्य मिळते. बँकिंग सेवा समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या बँका मदत करतात. बँकेच्या कामकाजावर रिझर्व बँक यांचे नियंत्रण असते.

नियामक देखरेखीअभावी या बँकांना आर्थिक अडचणी येऊ शकतात, जसे की PMC बँक प्रकरणात दिसून आले आहे.

कर्ज वसुलीसाठी सर्वप्रथम पतसंस्था थकबाकीदार व्यक्ती कर्जाची परतफेड करण्यासाठी संपर्क साधतात. जर पैसे भरले नाहीत, तर बँक किंवा कर्ज देणारी संस्था कर्ज वसुली एजंट नियुक्त करते किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू करते. कर्ज वसुली एजंट थकीत कर्जदार किंवा व्यक्तींकडून देय रक्कम गोळा करतात, त्यासाठी ते संपर्क साधणे, स्मरणपत्रे पाठवणे किंवा कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे यासारख्या पद्धती वापरतात.

एजंट थकीत कर्जाबद्दल कर्जदाराशी संपर्क साधतात आणि देय रकमेची माहिती देतात. देय तारखेनंतर स्मरणपत्रे आणि सूचना पाठवल्या जातात. जर कर्जदार पैसे भरत नसेल, कर्ज वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करू शकतात. यासाठी ते मालमत्ता जप्त करणे किंवा दिवाळखोरीच्या प्रक्रियेचा अवलंब करू शकतात. कर्जदार तृतीय-पक्ष एजन्सीला कर्ज वसुलीचे काम सोपवू शकतात. काही प्रकरणांमध्ये, कर्जदार आणि कर्ज देणारी संस्था मिळून कर्जाची पुनर्रचना करू शकतात, ज्यामुळे कर्जदार वेळेत पैसे भरू शकेल. कायदेशीर प्रक्रिया कर्जदार 60 दिवसांच्या आत देयके भरण्यास अयशस्वी झाल्यास, बँकेला कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार आहे. कर्ज वसुलीसाठी, कर्ज आणि दिवाळखोरीची वसुली (आरडीबी कायदा), 1993 अंतर्गत न्यायाधिकरणे स्थापन केली जातात. कर्ज वसुली एजंटने योग्य आणि नैतिक मानकांचे पालन करणे आवश्यक आहे.



विलास गजभिये
मो. 9421588901

जितके जास्त कर्ज वाटप होईल आणि कर्ज वेळेत परत देणे घेणे ही प्रक्रिया होईल तितकी पतसंस्था फायद्यात राहील.

मित्रजन महिला नागरी सहकारी पतसंस्थेने नोव्हेंबर 2025 महिन्यात केलेली 9,09,330 इतकी कर्जवसुली ही खरोखर कौतुकास्पद आणि अनुकरणीय कामगिरी आहे. ही कामगिरी महत्त्वाची यासाठी की आजच्या काळात सहकारी संस्थांनी आपला हक्क नियंत्रणात ठेवणे ही मोठी जबाबदारी असून, ही संस्था 0टक्के NPA मिशनकडे ज्या पद्धतीने प्रामाणिकपणे वाटचाल करत आहे, ती इतर संस्थांसाठीही प्रेरणादायी आहे. वसुली ही केवळ एक प्रक्रिया नाही; ती संस्थेच्या आर्थिक शिस्तीचा पाया असते. सदस्यांचा विश्वास टिकवून ठेवत नियमित आणि संयमी पद्धतीने केलेली वसुली संस्थेचे भवितव्य मजबूत करते. सागर मेश्राम आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून शिकण्यासारखे म्हणजे एकत्रितपणे काम करताना सातत्य, प्रामाणिकपणा आणि सभ्य संवाद यांची किती महत्त्वाची भूमिका असते. हे दिसते तर प्रत्येक जण आपली जबाबदारी मनापासून पार पाडतो तेव्हा संस्था फक्त वाढत नाही, तर नवीन मापदंडही निर्माण करते.

विशेष म्हणजे महिलांनी नेतृत्वात असलेल्या या संस्थेची कामगिरी नागपूरसाठी एक आदर्श ठरू शकते.

टीमने दाखवलेली शिस्त, मेहनत आणि एकजूट पाहून खरोखर आनंद वाटतो. अशीच प्रगती पुढेही होत राहो, आणि मित्रजन महिलासंस्थेचा आदर्श सहकार क्षेत्रात नाव असेच राहो असते सी. ए. श्रीकांत दुबे सदस्य महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचे नियामक मंडळ यांनी आपल्या संदेशात लिहून पाठविले आहे.

संस्थेच्या नावातच मित्र शब्द आहे आणि आपण मित्र परिवार जोडण्यात यशस्वी झालात. असे ही ते पुढे नमूद करतात. मित्रजन ही धडपड आपल्या सहकारातील आपली तळमळ आहे. आपण एक यशस्वी एस.आर.ओ. आहात. मिशन शून्यसाठी आपली धडपड प्रशांनिय आहे. त्यासाठी आपण प्रशिक्षण सोडत नाही. प्रशिक्षणातून अनेक बाबीवर चर्चा होत असते. अशीच कर्ज वसुली झाली तर पतसंस्था, बँक पुढेच जातील. आर्थिकदृष्ट्या सक्षम विश्वास निर्माण करतील अशी खात्री आहे. ■■

## अभिवादन

बाबा तुम्ही होता,
म्हणून आम्ही आहोत,
तुमच्या कर्तृत्वावरच,
आम्ही आजचा प्रकाश बघत आहोत,
तुम्ही ललकारी फोडली होती दिल्लीच्या दरबारी
मानुसपन नाकारणाऱ्या प्रवृत्तीचे,
सारे आसमंत हादरले होते त्या वेळी,
तरी बाबा तुम्ही एकटेच लढत होते,
त्या संगरात तुमचेच,
आमच्या सारख्यांचे अनेक हात होते तुमच्या सोबत, पण बाबा, ते समधेच पंगू होते,
बाबा, त्या आमच्या हातात बळ नव्हते विद्येचे,
बाबा, आमच्या डोक्यातील मेंदूही बधिर झाला होता,
बाबा पिढ्यानपिढ्या गारद करणारे,
त्यांचे ते मनसुबे या भारत भूमीवर थैमान घालत होते,
मनुच्या विषारी पिलावळासारखे,
बाबा, त्या संवेदनहीन समुदायाने
इथल्या अकिंचनी मानसाना,
जगन नकोस केल होत,
बाबा, तरिही या विदारक वादळ वाऱ्यातून
हा मानवी समुदाय सुखरुप बाहेर काढला आपण,
त्या पायाना बळ,
आपण दिल बाबा,
बाबा, मृतावस्थेत असलेल्या देहाला,
उर्जावान आपणच केल,
पांगळ्या झालेल्या हाताना,
नवे स्फुरण आपणच दिलेत,
आता आमच्या धमण्यातून, आपलेच,
वैचारिक रक्त प्रवाहित होत आहे
हात सळसळताहेत,
पण शांती संयमाचा आपणच दिलेला
विचारही आम्ही स्विकारला आहे,
बाबा आपण दिलेल पुस्तक,
याच हातानी घट्ट पकडल आहे,
म्हणुनच बाबा,
आज याच हातानी,
आम्ही आपणास अभिवादन करतो आहे,
आपल्याच उर्जेने,
नवा संकल्प करतो आहे,
विषारी पिलावळ नेस्तनाबूत करुन टाकण्याचा,
बाबा अभिवादन करतो,
तुमच्या असण्याला,
अभिवादन करतो,
तुमच्या वैचारिक अस्तित्वाला,
अभिवादन करतो,
तुमच्या तडफत्या शब्दाना,
अभिवादन करतो,
तुमच्या लेखणीच्या प्रत्येक अक्षराला,
बाबा अभिवादन करतो,
आपण प्रदान केलेल्या बुद्धाच्या शांतीला
बाबा अभिवादन करतो,
बडोद्याच्या संकल्प भूमीत
ओसंडलेल्या आपल्या प्रत्येक अश्रूला,
कारण, बाबा तुम्ही होता,
म्हणून आम्ही आहोत,
तुमच्या कर्तृत्वावर,
आम्ही आजचा प्रकाश बघत आहोत!

**दादाकांत धनविजय**



**काव्यफुले**
संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

## आना आठवणीत तुमच्या राजाभाऊ

बाबा भीमाचा शोभतो शिष्य खरा तो
त्यांनीच पारखला कोहिनूर हिरा तो
आना आठवणीत तुमच्या राजाभाऊ
विद्वानाचा बुद्धिवंत अनुयायी तो
लोकांच्या गर्दीत मिसळून राही तो
सांगा अजून कोणते गुण गाऊ
नेता असावा पट्टीतला संसद पटू
सांगाव्या लोकांच्या समस्या कटू
तुम्ही करताय नुसतेच काऊ चिऊ
घरी धनवान सुखवस्तू वाढला तो
नाही रागात कुणावरही चिडला तो
झटला लोकहितासाठी धावू धावू
वैभव विलासास त्यागलेले बंडा
आज्ञा भीमाची हृदयी क्रांती झंडा
त्याची तुलना कोणाशी आता लावू
महान संघटनेचा शिरोमणी ठरला
भल्या भल्यांना सकुशलतेने पुरला
म्हणे अख्ख्या भारतात निळा झेंडा ठेवू
तुम्ही स्वतःचाच विचार करता
अवघ्या समाजाला धोक्यात मारता
मी का बरं कुत्र्याची लाचारी पाहू
आमची पुढारी लागे बावनकशी
वैशाखी पौर्णिमेचा शीतल शशी
नक्की होतील नामोहरम भाड खाऊ

**डॉ. मुकुंद मेश्राम**

## महात्मा फुले

अविद्येच्या अंधारात विषमतेच्या आसमंती,
धन्य ते महात्मा फुले प्रजवीली क्रांती ज्योती.
चहूकडे विषमतेचा अंधार दाटलेला,
गुलामीच्या डबक्यात माणूस फाटलेला,
जुलमी अन्यायाची उद्रेक झाली क्रांती,
धन्य ते महात्मा फुले प्रजवीली क्रांती ज्योती.....
स्त्रीयांची पहिली शाळा काढून शिक्षण दिले,
सती प्रथा बंद करूनी विधवांचे रक्षण केले.
मनुवादी रुढ्या तोडून जागविला नारीशक्ती.
धन्य ते महात्मा फुले प्रजवीली क्रांती ज्योती..
केले हौद घरचे खुले तहानलेल्या दलितांना,
माणुसकीचा महात्मा कर्दनकाळ सनातन्यांना.
मनुवादी गटारीतून मानवाची केली मुक्ती.
धन्य ते महात्मा फुले प्रजवीली क्रांती ज्योती.

**-चित्तरंजन चौरे, 9373713325**

## बाबा! घ्यावा जन्म नवा

बा भीमा! तुमचे लोक 'गुळाला' चिकटले
पहा स्वार्थासाठी कसे एकवटले
समाजाचा विचार नाही आठवले
समाजाचे करून तुकडे,
'तुतारी' वाजविले ...1...
बा भीमा! तुम्ही नव्हते कधी 'लाचार'
बोधिसत्व; तुम्ही 'सम्यक आचार'
आमचे नेते करती 'सैराचार,'
होऊनी लाचार लोणी लुटती अपार ...2...
बा भीमा! तुम्ही तोडल्या वेड्या परंपरेच्या
पण, गातो गोडवा मनुवाद्याच्या नीतीच्या
'बळी' पडतो खोट्या 'प्रीतीला' मनुवाद्याच्या
विसरून मोल बाबा! तुमच्या श्रमाच्या...3..
सहा डिसेंबर, रॅली वेळे पुरती काढतो
अंधश्रद्धेच्या रुढीला ना कधी दूर सारतो
ना कधी जना -जनातस एकत्र जोडतो
आम्हीच 'पुढारी' हेच सांगतो....4...
तुम्ही दिले संविधान स्वातंत्र्याचा दिवा
समता अन बंधुत्वाचा 'गोडवा'
समाजाचा 'प्राण' सर्वांसाठी समान न्यायाची हवा
बाबा! तुम्ही घ्यावा जन्म नवा, घ्यावा जन्म नवा ...5...

**इंजि. शुद्धोधन वडवणे मो.9665423622**

## दु:ख नारीचे

पोथ्या पुराण वाचले
धर्म ग्रंथही चाळले
दु:ख शोषित नारीचे
कोण्या देवाला कळले
देवादिकाने त्रासले
जीर्ण रुढीने ग्रासले
अपमानाचे जहर
नारी कितीक प्राशले
व्यवस्थेने टाकल्या गं
तुझ्या पायात श्रृंखला
संविधानाने मोकळा
श्वास केलाय गुंतला
सतीच्या गं चालीमुळे
होता अस्तित्वाला धोका
संविधान देते आज
तुला जगण्याचा मोका
संविधानामुळे झालं
खुलं समतेचं रान
पुरूषांच्या बरोबर
आज मिळतो गं मान
चुलं मुलं तुझं गेलं
आलं कष्टाला गं फळ
संविधान देते तुला
उंच उडण्याचं बळ
संविधानाच्या छायेत
तुला भीमाने झाकले
न्याय स्वातंत्र्य समता
तुझ्या ओटीत टाकले

**सुभाष मानवटकर (निळं पाखरु)**

# पालथ्या घड्यावर पाणी

**तेजोमयीच्या सोसायटीच्या बाजूला एक इंटरनॅशनल स्कूल आहे. ही तशी श्रीमंतांची म्हणा किंवा हायफाय लोकांची शाळा. कारण या शाळेतील सगळी मुलं मुली त्यांच्या आईबाबांच्या चकचकीत महागड्या गाडीतून येतात. या शाळेत दररोज नृत्य, गाणी, वक्तृत्व स्पर्धा असे कोणते ना कोणते कार्यक्रम होतात. त्यासाठी ध्वनीक्षेपकाचा वापर केला जातो. त्याचा आवाज खूपच मोठा ठेवला जातो. दररोजच्या प्रार्थनेच्या वेळीही ध्वनीक्षेपकाचा आवाज असाच मोठा असतो. या कर्कश आवाजामुळे सोसायटीतील आजी आजोबांना त्रास होतोच पण शेपूटवाल्या दोस्तांनाही त्रास होतो.**

सोसायटीच्या अध्यक्षांनी बरेचदा शाळेच्या मुख्याध्यापकांकडे लेखी तक्रार करुनही काहीच उपयोग झाला नाही. दिवसेंदिवस त्रास वाढतच चालला होता. पोलिसांकडे तक्रार करावी का? यावर सोसायटीच्या सभेत चर्चेत चर्चा झाली. पण त्याआधी शिष्टमंडळानं मुख्याध्यापकांना भेटून त्यांना आजूबाजूच्या सोसायटितील वृध्दांना आणि प्राण्यांना होणारा त्रास समजून सांगावा, असे एकमताने ठरले. त्यासाठी एक युक्ती तेजोमयीच्या बाबांनी सुचली. त्यांनी अध्यक्षांच्या कानात ती टाकली. त्यांनी सगळ्यांना सांगितली.

रितसर वेळ घेऊन सोसायटीचे शिष्टमंडळ या शाळेत गेले. मुख्याध्यापकांच्या दालनात गेल्यावर तेजोमयीच्या बाबांनी अचानक मोबाइलच्या यूट्युबमधील एक गाणे पूर्ण आवाजात सुरु केले. हे बघून इतरांनीही अशीच कृती केली. आवाजाच्या या गोंगाटाने मुख्याध्यापक गांगरुन गेले. त्यांना या शिष्टमंडळाचा खूप राग आला. तो त्यांच्या चेहऱ्यावरुन दिसू लागला.

स्टॉप इट, स्टॉप इट. थांबवा थांबवा हा आवाज. ते रागाने ओरडले नि त्यांनी त्यांच्या टेबलवरची छडी धाडकन आदळली. कानावर हात ठेवले.

काय झाले सर इतके रागावायला नि कानावर हात ठेवायला? तेजोमयीच्या बाबांनी गंभिर चेहऱ्याने विचारले.

अहो, काय झाले म्हणून काय विचारता? किती मोठ्याने तुम्ही सर्वांनी मोबाइलमधील गाणी लावलित. मला त्रास देण्यासाठीच हे असे करताहात ना तुम्ही मुख्याध्यापकांचा पारा आता फार चढला होता. आम्ही तुम्हाला त्रास देण्यासाठी आलो नाहीत सर. मग हे हे काय? इतका मोठा आवाज म्हणजे किती मोठे साऊंड पोल्यूशन, किती मोठे ध्वनी प्रदूषण, हे तुमच्यासारख्या सुशिक्षितांच्या लक्षात यायला नको का? मुख्याध्यापकांचा राग काही कमी होत नव्हता. त्यांच्या तोंडून ध्वनीप्रदूषणाचा उल्लेख होताच तेजोमयीच्या बाबांनी मोबाइल बंद केला. इतरांनिही तेच केले. केबिनमध्ये शांतता पसरली. मुख्याध्यापकांनी गटागटा पाणी पिले. गोंगाटामुळे ते बरेच अस्वस्थ झाले होते. त्यांच्या कपाळावरुन घाम ओघळू लागला होता.

आवाजाचा गोंगाट थांबताच मुख्याध्यापकांना हायसे वाटले. त्यांनी कपाळावरचा घाम पुसला. ते काही बोलणार तोच तेजोमयीचे बाबा त्यांना म्हणाले,

सर एवढ्याशा आवाजाने तुम्हाला ध्वनीप्रदूषण, साउंड पोल्यूशनचा त्रास व्हायला लागला. पण दररोज तुमच्या शाळेत वेगवेगळ्या कार्यासाठी ध्वनीक्षेपणातून आवाजाचा दणदणाट होतो, तेव्हा आजूबाजूच्या सोसायटीतील वृध्दांना, प्राण्यांना आणि जे काही चार-दोन पक्षी आपल्या आभाळात उडताना दिसतात, त्यांना किती त्रास होत असेल, ते किती अस्वस्थ होत असतील, याची काही कल्पना आहे का तुम्हाला?

नाही म्हणजे हो,

म्हणजे तसा काही आमचा हेतू नाही, म्हणजे असे काहीतरी मुख्याध्यपक त त प प करु लागले.

अहो सर, तुमच्या शाळेत मुलांना तुम्ही ध्वनीप्रदूषणाचा धडा शिकवत असालचना. जे शिकवता त्याच्या अगदी उलटं तुम्ही वागता. हे म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी, असे झाले. अध्यक्ष म्हणाले. अशाने मुलांना कसे काय महत्व कळणार ध्वनीप्रदूषणांचे? त्यांना तर हा विनोदच वाटणार. सचिवांनी मुद्दा मांडला.

ही मात्रा चांगलीच लागू पडली.




सुरेश वांदिले

मुख्याध्यापकांनी चमकून सगळ्यांकडे बघितले. त्यांच्या कपाळावर पुन्हा घाम आला. तेजोमयीच्या बाबांनी त्यांना पाणी दिले. मुख्याध्यापकांनी कपाळावरचा घाम पुसला. सर्वांसमोर हात जोडून त्यांनी क्षमा मागितली. यापुढे कधीही ध्वनीक्षेपकाचा असा वापर करणार नाही हे त्यांनी कबूल केले.

जाता जाता तेजोमयीचे बाबा म्हणाले, सर, शाळेत शिकवणारे धडे, मुलांनी त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात तसेच गिरवायचे असतील तर, जे तुम्ही शिकवता, तसच नको का वागायला?

मुख्यध्यापकांनी आपली चूक मान्य केली. यापुढे असे काहीही घडणार नाही हे त्यांनी पुन्हा एकदा कबूल केले. ■■

# नटव्या नानाची गोष्ट

**जन्मास आलेल्या माणसाला कोणता छंद, व्यसन असेल सांगता येत नाही. त्याला जात, धर्म, पंथ आणि परिस्थिती यांचे बंधन नसते. व्यसन, छंद तसे प्रत्येकाला असतचे. जो तो आपापल्या पद्धतीने ते करतो, स्वीकारतो. आता व्यसन, छंद यांचा अर्थ कुणी कसाही सोईस्कर घेईल. त्या शाब्दिक वादात आपण न पडता मुळ विषयाकडे वळू या. तर, आमचा नाना म्हणजे सर्वांचा नटव्या नाना म्हणजे गावाचा हिरोच. हिरो म्हणजे अभिनेताच तो. पण समाजात एक रक्त आहे, सरळ कुणाला न बोलता जरा वेगळे नाव देऊनच त्याची ओळख करणे. तसे नानाला नट, अभिनेता, कलाकार न म्हणता 'नटव्या' हे सर्वपरिचित नाव दिले गेले.**

कुणाचा उद्देश काही असो पण या नावापुढे नाटक, सिनेमातले हिरो फिके नव्हे साऱ्यांना खुजे दिसायचे. इतके यांचे नटणे, मुरडणे, वागणे असायचे. नाना तसा हाडाचा कलाकारच. त्याला काय येत नव्हते? असे नव्हे! त्याला सगळेच येते होते. गाणे, नाचणे, अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य, वादन, संगीत अगदी कलेला, नाटकाला आवश्यक असणारे त्याला सर्वच येते होते. अभिनयाचा बादशहाच होता नटव्या नाना. आपल्या अभिनयातून तो भूमिका जीवंत करायचा. ऐतिहासिक, सामाजिक, काल्पनिक पात्र हुबेहूब करायचा. थोडक्यांत, आपला जीव त्यात ओतायचा. इतका तो त्यात तल्लीन एकरूप, एकजीव व्हायचा.

नानाने वेगवेगळ्या भूमिका केल्यात. तो कधी शिपाई तर कधी राजा, भिकारी, सामान्य कार्यकर्ता, नेता, पुढारी, कधी विनोदी तर कधी खलनायकी रंगवायचा. सहावारी, नऊवारी नेसून एखाद्या घरंदाज बाईची नक्कल करायचा. त्याचा आवाजही जसे गाणे तसा असायचा. भावगीत, भक्ती, नाट्यगीत, अभंग, पोवाडा ते लोकगीत अगदी सुस्वरात पहाडी आवाजात गायचा. नानाचे शिक्षण अगदी आठवी नापास. पण भले भले शिकलेले त्याच्या वक्तृत्व, अभिनयापुढे झुकलेले वाटत. वडिलांचा छोटासा व्यवसाय व जोडीला शेती होतीच. तिथेही याचा हातभार होताच. पण नाट्य कलेसाठी याचे तिकडे दुर्लक्ष होत होते. नानाच्या एकत्र कुटुंबात याच्या छंद कलेला मूकसंमतीच होती.



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

नानाच शिक्षण कमी. पण तो स्वतः गीत आणि नाट्य लेखन जोडीला दिग्दर्शन त्यामुळे पंचक्रोशीत तालुक्यात जत्रा पूजा सामुदायिक ठिकाणी करमणुकीचा कार्यक्रम तयार करताना नानाची सर्वांना गरज लागायची. त्याला सर्वजण सन्मानाने अगदी थोडे जास्त मानधन देऊन बोलावीत असत. नानाचे मार्गदर्शन, दिग्दर्शन आणि त्यात त्याची भूमिका असणे म्हणजे रसिकांना मोठी पर्वणीच असायची. जत्रेपेक्षा यांच्या कार्यक्रमाला तुफान गर्दी. नानाच्या नावाचा सर्वत्र बोलबाला होता. एकदा म्हणे सिनेमा नाटकात नाव असणारा मोठा कलाकार नानाच्या कार्यक्रमाला वेषांतर करून आला होता. तो प्रेक्षकांत बसला आणि कार्यक्रम संपताच स्टेजमागे जाऊन तू शहरात चल, तुला व्यावसायिक नाटकात, सिनेमात काम देतो म्हणाला. पण 'गड्या आपला गाव बरा!' या उक्तीनुसार नानाने नम्रपणे नकार दिला. नानाच्या नाव लौकिकात भर पडत होती. अल्पवयात तो स्वकर्तृत्वाने प्रसिद्धीस येत होता. त्याचा रुबाब, अभिनय, अंगभुत गुण, स्वभाव पाहून कुठल्याशा नाटकात काम करताना शहरातून आणलेली 'नटी' नानावर भाळली. नानाचे वय जास्त होतेच. मात्र चालून आलेली संधी कोण सोडील? शिवाय तीही आपल्या आवडीच्या क्षेत्रातली. दोघे मिळून काही तरी अजून प्रगती करु असा विचार करून 'पट मंगणी, झट शादी!' करत नानाने तिच्याशी विवाह केला. तिनेही तिच्या आईबापाच्या विरोधाला न जुमानता नानाबरोबर संसार करण्याचा निर्णय घेतला होता. नानाच्या घरच्यांनी, भावकीने जात, धर्म न पाहता यांच्या प्रेमाचा आदर करुन दोघांचे शुभमंगल केले.

शहरात राहणारी मुलगी, प्रेम आंधळे असते, यापेक्षा नानाच्या रुबाब व कलेवर ती भाळली खरी, पण म्हणतात ना माणसाला दोन मने असतात. क्षणिक प्रेम, नव्याचे नऊ दिवस संपले. तिच्या अपेक्षा एकत्रित कुटुंबात हा नाना पूर्ण करू शकला नाही. शहरात राहणे नानाला आवडणारे नव्हते. दोघांच्यात हळुहळू धुसफूस सुरु झाली. घरच्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मध्यस्थी केली. नाटकांत जसा प्रेमाचा खोटा अभिनय दोन तीन तास रंगतो तसा संसारी जीवनात रंगत नाही. नाटकातली नटी हिरोसाठी त्याग करते. प्रेमाला जागते. पण नानाच्या खऱ्या आयुष्यात असे घडले नाही. प्रेमाचे नाटक झाले. वर्षभरात पत्नी सोडून गेली. याची चर्चा सर्वत्र रंगली. हा धक्का की झालेली बेइज्जत नानाला सहन झाली नाही. गेली ती गेली तिने घटस्फोटाची नोटीस पाठविली. नानानेही सही दिली. इथूनच त्याच्या कलेला आणि जीवनाला उतरती कळा लागली. तो बेचैन झाला. त्याचे कशातच लक्ष लागेना. स्वप्नात आल्यासारखी ती आली न गेली पण नानाला मात्र हा धक्का पचवीता आला नाही, त्याने व्यसनाला जवळ केले. त्यामुळे नाटक दिग्दर्शनाला त्याला लोक टाळू लागले. कारण याचे चित्त स्थिर नसे. हा आपल्या नाटकाची वाट लावेल म्हणून दुसऱ्याला बोलावू लागले. हा नानावर आघातच होता. तो लोकांना सांगे, माझ्यावर विश्वास ठेवा. मला संधी द्या, बोलवा. मात्र एकदा कानफाट्या नाव पडले की ते कायम राहते. चांगला कलावंत असलेल्या नानाला त्याच्या वाढत्या व्यसनामुळे लोकांनी त्याला नाकारले. नानाने व्यसनाला जवळ केले. एका चांगल्या कलावंताच्या आयुष्याचे असे 'नाटक' झाले! ■■

# मानव मुक्ती लढ्यातील आंबेडकरी तत्वमूल्यांच जाज्वल्य प्रतीक 'तूच दिले मला हे जगणं'

**बी. अनिल उर्फ अनिल भालेराव हे परिवर्तन चळवळीतून आलेल्या विचारश्रृंखलेतील नावारुपाला आलेले चतुरस्त्र साहित्यिक, त्यांच्या नावावर 21 साहित्य कृतीची नोंद आहे. त्यांचे साहित्य माणसाच्या वेदनेचा हुंकार मांडणारे असून दखलपात्र आहे. त्यांचा अलीकडे प्रकाशित झालेला, 'तूच दिले मला हे जगणं' हा काव्यसंग्रह वाचनात आला. मुखपृष्ठावर अजिंठा लेणीचे सौंदर्य, तथागतांच्या सम्यकदृष्टीचा वारसा सांगणारे देखणे शिल्प, माणुस धर्माची क्रांतीबीज पेरुन सर्वहारा शोषित जनतेला आश्वासित करणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा चित्रित केलेली आहे.**

आज जे काय जगणे आहे, ते केवळ अन् केवळ पूर्वसूरींनी केलेल्या विवेकबुद्धीच्या विद्रोहात्मक लढ्यामुळे आहे. हा लढा समता व न्यायाच्या ढाच्यावर उभा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच या लढ्याचे उद्गाते व जनकही आहेत. प्रज्ञासुर्याच्या प्रज्ञाज्वालेच्या शलाका परिवर्तनवादी साहित्यिकांच्या रुपाने समतेचे प्रकाशपर्व प्रज्वलित करीत आहेत. 'व्यवस्थेविरुद्धच्या क्रोधाला आणि द्वेषाला दूर करून तूच सर्व जणांना दिलेस मूलभूत जगण्याचे हक्क आणि अधिकार आणि पेरून गेलास बुद्ध हिमाचल ते महासागर' हा व्यवस्थेविरुद्धचा आक्रोश व माणूसपण बहाल करणारा धम्म देणारा बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीचा उपकार शीर्षक कवितेत व्यक्त केला आहे. जात्यांध धर्माच्या दलालांनी धर्मग्रंथात पेरलेली जात फोफावण्यासाठी धार्मिकतेचा स्तोम माजवून खतपाणी घातले. सत्तापिपासू राजसत्तेच्या ठेकेदारांनी सत्ता राखण्यासाठी धार्मिक सण उत्सव, व्रतवैकल्यांच्या उदात्तीकरणासाठी कोटी रुपये खर्च करून देश जखडून ठेवला. स्वच्छंदी (मोकाट) पणे लोकशाही मूल्यांच्या छाताडावर टिच्चून धर्माचा हत्यार म्हणून वापर केला जातोय. म्हणूनच जात न बदलणारा अमानवी, कर्मकांडी, बुरसटलेल्या विचारांचे आगार असणारा माणूस गुलाम बनविणारी अधर्म त्यागला व बुद्ध धम्म दिक्षा घेतली. हा 'नवजागर' माणूसपणाचा निर्मिती करणारा आहे. युद्धाला गाडून बंधुभाव, एकात्मतेची कास धरणारा आहे, 'तलवारीचे दिवस आता संपत चाललेत. लेखण्या आता सरसावल्या आहेत. जागर होतोय मानवतेचा शांती, सत्य, अहिंसेच्या नव्या जगासाठी' बी. अनिल यांची कविता स्वातंत्र्योत्तर भारतातील बहिष्कृत जनतेच्या उन्नयनासाठी समतासूर्याचा प्रकाश पेरती झाली आहे. स्त्री शोषण व दास्याचा जाहिरनामा असणाऱ्या अधर्मात स्त्रियांचे स्थान गुलामापेक्षाही नीच दर्जाचे होते. गौतम बुद्धांनी 2500 वर्षा आधीच स्त्रीसमानतेची शिकवण आचरणात आणली व महिलांना धम्मात मानाचे स्थान दिले. मात्र आजही महिला कर्मकांड, बुरसटलेल्या चाली रिवाज व पुरुष प्रधान संस्कृतीच्या जंजाळात स्वतः झोकून देत धन्य धन्य होतात. ही वास्तविकता कवी 'बाय तुझा धर्म कोणता?' हा उद्विग्न प्रश्न निर्माण करून स्त्रीमुक्ती हक्काची जाणीव करून देतात, 'खरे तर तू पुरुषाच्या धर्माची होत जाते जरी तुला नसतो स्वतःचा धर्म तुझ्या रक्तस्रावालाही न सतो धर्म अंतर्भावालाही लावलेला नसतो धर्म भाकड सहाव्या इंद्रीयात डोकावतेस तू?' हि स्त्री गुलामीची शृंखला डॉ. बाबासाहेबांनी तोडली. पाण्यासाठी सत्याग्रह ही जगातील ऐतिहासिक व अचंबित करणारी घटना होती. आज चवदार तळ्याचे पाणी थंड झाले तरीही अधूनमधून पाण्यावर हक्क सांगणारी मनुवादी सडक्या डोक्याची गिधाडे अत्याचार करतात, लचके तोडतात. 'किती दिवस भीत रहायचे बाजारबुणग्यांना आणि शोषकांना? फोडावेच लागतील खडक आणि ओंजळीने पाणी प्यावे लागेन' हा सडेतोड इशारा कवीने दिला आहे. स्वातंत्र्योत्तर दलित, शोषित, बहिष्कृत गावकुसाबाहेरील सर्वहारा समाजातील प्रत्येक घटकाची उन्नती झाली कां? अधिकार व हक्कांसाठी नव्याने हा लढा द्यावा लागेल ही मुजोर सत्ता उलथवून टाकल्याशिवाय स्वातंत्र्याची फळे चाखायला मिळणार नाहीत. सांगा आमचा धनाचा साठा कुठे आहे हो? असा सवाल टाटा, बाटा, बिर्लासारख्या मूठभर धार्जिण्या तत्कालीन सरकारला लोककवी वामनदादा कर्डक यांनी विचारला होता. तोच सवाल आज कवी बी. अनिल भांडवलशाही अर्थव्यवस्था पोसणाऱ्या सत्तेला विचारतात. अनेक भ्रष्टाचारी नेते, कर्ज बुडवे, कोटींची भ्रष्टाचारी उड्डाण करणारी भ्रष्ट लाचखोर शासनव्यवस्थेच्या पाठराखण करणाऱ्यांना हा आमचा प्रश्न, सांगा आमच्या स्वातंत्र्याचे काय झाले? हा देश आमचाही आहे. इथल्या प्रत्येक कणाकणावर माणूस म्हणून आमचाही हक्क आहे.

साहेबराव मोरे
मो. 940404860

हे सरकार तू जागतिक सावकाराच्या दावणीला बांधून 'स्वदेशी' चा उद्घोष करीत धूळफेक केली आहेस. भांडवलदारांना स्वातंत्र्य देत आमचे स्वातंत्र्य लालफितीत गुंडाळत आहे. सांग, आमच्या स्वातंत्र्याचे काय झाले? अंबानी, अदानी मित्तल यांच्या घशात देणगी, कर्ज रूपाने देशाची गंगाजळी जात आहे. दुसरीकडे मल्या, ललित मोदींसारखे कर्जबुडवे भगोडे विदेशात अय्याशीत मस्त जगत आहेत. दीनदलित, आदिवासी, स्त्री गुलामी, शेतकरी, बेरोजगार, कष्टकरी, कर्मचारी, मध्यमवर्गीयांच शोषण करणारी व्यवस्थाच 'या वांझ सत्तेला उलथवून टाकले पाहिजे' कवितेतून नेस्तनाबूत करण्याचा उद्घघोष कवी करतो आहे, 'आता उलथावीच लागले ही वांझ सत्ता ज्योतीबांचा शेतकऱ्यांना आसूड घेऊन बिरसाचा उलगुलान डोक्यात घेऊन दंगलीत निडरपणे उभा राहणारा गांधी घेऊन आणि आंबेडकरांचे संविधान घेऊन डॉ. आंबेडकरांनी सर्वहारा समाजोन्नतीसाठी स्वातंत्र्यासह शिक्षण, नोकरी, राजकीय समानतेचे अधिकार घटनेत बहाल केलेत, सामाजिक मूल्य परिवर्तनाचा सत्यशोधन बुद्ध धम्म सोपान दिला. याच अनुषंगाने 'बोधी' कवितेचा उल्लेख अटळ ठरतो. कवितेतील शब्द व अर्थ सौंदर्य तथागतांच्या? 'बोधी' रूपाच चित्र डोळ्यासमोर हुबेहुब उभे करते. आशयसौंदर्यातील वाच्यार्थ स्तंभित करतो. 'वाढत जाते सूर्याच तळपणे उन्हात तुझ्या स्तनाचे दृश्य लेणे बोधी भरून येतो. कणाकणात ओल्या देठातून' बी अनिल यांच्या कवितेत शब्दांची अचूक व चपखल निवड असते, शब्दोत्कट भावनांचा सहजोद्रेक असतो, 'माणुसकीचा जाहीर नामा घ्या. हातात विश्वकल्याण आणि बंधुता हृदयात कोरून समोरचा कदाचित हिंसक होईल म्हणून त्यांच्यातील करूणेला हाक द्या. आशयसौंदर्य व भाषिक सौंदर्य हे गुणविशेष मनात भरते. मूळात माणुसकीचा जाहीरनामा दरेकाच्या मनात रूजविणारा संदेश देणारी असल्याने दखलपात्र आहे. 'मानवता, समाजसत्ता, असावी माणसे माणसासारखी, उलट्या काळजाची माणसे इथे, माणूसपणाचा, सत्यशोधक, भय वाढत चाललेय इथे, दरवेशी असे आयुष्य, आरक्षणापूर्वी जात होती, नवजागर, आता निवांत बसू कसा? आदी कविता मानवतावादी मूल्ये रूजविणाऱ्या, चिंतनशीलतेची साक्ष देतात. मानवतेचा अखंड एल्गार पुकारणाऱ्या सर्वच कवितांचा समावेश करणे शक्य नाही, त्यासाठी हा काव्यसंग्रह एकदा वाचायलाच हवा. माणसाला गुलाम बनविणारी सर्वकालिक प्रश्नांची उकल शोधणारी ही कविता आहे. प्रस्तुत काव्यसंग्रहचे एक वैशिष्ट्य म्हणजे प्रस्तावना, पाठराखण या अलिखीत संकल्पनेला फाटा देऊन कवीने जो संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याविषयीचा अभिप्राय अभ्यासक व वाचकांनी आवर्जून नोंदवावा. जीवनातील अस्तित्व लढ्याचे वास्तव मलपृष्ठावर मुद्दामहून मुद्रीत केले आहे. शेवटी संविधान निर्माण करून नव्या समाजाची सम्यक जडणघडण करणाऱ्या समाज नायकाला 'बा भीमा' कवितेतून बी. अनिल यांनी यथोचित, यथोमती मानवंदना दिली आहे, पण कोंबडे आवरले नाही किंवा डांबून ठेवले डाल्याखाली, तरी सूर्य थोडाच थांबतो उगवायचा द्वंद्वात्मक पातळीनूसार दिवस उगवतोच तसेच झाल बा भीमा तू आकाश व्यापून टाकलेस तुझ्या शब्दांनी इतके की, Dead Ambedkar is dangerous than Ambedkar alive.

बी. अनिल यांना परीवर्तन चळवळीच्या लेखन कार्यास शुभेच्छा! ■■

**समीक्षण :** विद्रोही कवी साहेबराव मोरे
**संवाद :**9404048601
**काव्यसंग्रह :** तूच दिले मला हे जगणे
**कवी:** बी. अनिल
**प्रकाशन :** आदिती प्रकाशन, बदलापूर
**किंमत :** 200/-

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA




## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा संविधान चौक नागपूर.

नागपूर महापालिकेच्या वतीने भारतीय रिझर्व बँक समोर आणि विधानसभा भवनच्या बाजूला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा उभा करण्यात आलेला आहे. सुंदर, देखणा पुतळा लोकांचे मनमोहक आकर्षण करते. या चौकाला संविधान चौक म्हणतात. न्याय, हक्क मागण्या संदर्भात येथे आंदोलने होत असतात. सर्व राजकीय पक्षांचे नेते येथे अभिवादन करण्यासाठी येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारला मानणारे हजारोंच्या संख्येत उपस्थित असतात. संपूर्ण भारतातील लोक या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे,
मो. 9370773608

# जिल्हा न्यायालयात संविधान दिन सोहळा



**नागपूर :** जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर येथे जिल्हा वकील संघटनेच्या वतीने जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर येथील सभागृहात संविधान दिन सोहळा झाला. कार्यक्रमास उद्घाटक मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. एम. एम. नेरळीकर हे तर प्रमुख पाहुने मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. एस. एस. ठोंबरे यांचेसह अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्या. डी. पी. सुराणा उपस्थित होते. या सोहळ्यास प्रमुख मार्गदर्शक ॲड. सचिन मेकाले यांचेसह विचारमंचावर जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे, महासचिव ॲड. मनिष रणदीवे व उपाध्यक्ष ॲड. उषा गुजर यांची विशेष उपस्थिती होती. न्या. एम. एम. नेरळीकर यांनी संविधानातील नैतिक मूल्य जपणे आम्हा सगळ्यांची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले तर न्या. एस. एस. ठोंबरे यांनी संविधानातील समता व न्याय शेवटच्या घटकापर्यंत पोहचवीणे हे वकील म्हणून आम्हा सर्वांचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी वकीली व्यवसायातील चढउतारावर भाष्य करीत आपल्या वकीली जीवनातील अनेक आठवनींना उजाळा दिला. संविधानाची मोडतोड करून समाजात शांतता व सलोखा टिकून राहणार नाही. संविधानाच्या मुळ रचनेचा गाभा हा समता स्वातंत्र्य आणि बंधुतेला टिकवून ठेवण्यासाठी अबाधित राहण्याची गरज असल्याची भूमिका प्रमुख मार्गदर्शक ॲड. सचिन मेकाले यांनी मांडली.याप्रसंगी 50 न्यायलयीन अधिकाऱ्यांनी सामुहिक संविधान प्रस्ताविकेचे वाचन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड.आशीष नागपूरे, संदीप बावणगडे, ॲड. मनोज मेंढे, ॲड. श्रीकांत गावंडे, ॲड. श्रीकांत येडलेवार, ॲड. सौरभ पोद्दार, यांचेसह डीबीएच्या कार्यकारिणीने परिश्रम घेतले, संचालन व आभारप्रदर्शन ॲड. तेजस दाढे यांनी केले.

# ग्रामस्थांच्या श्रमदानातून साकारला वनराई बंधारा



**हिंगणा :** जमिनीतील पाण्याच्या पातळी असताना त्यात वाढ करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत सावंगी देवळी, ता. हिंगणा शिवारातील नाल्यावर ग्रामस्थ, ग्रा.प सदस्य, ग्रा.प कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी, सर्व ग्राम पंचायत अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी श्रमदान करून नुकतीच वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली आहे. पावसाचे प्रमाण वाढत असताना पावसाचे दिवस मात्र कमी होत आहेत. कमी दिवसात अधिक पाऊस कोसळत असल्याने पावसाचे बहुतांश पाणी जमितीत झिरपण्याऐवजी वाहून जाते. 40 गावांच्या शिवारात 80 बंधारे निर्मिती उद्दिष्ट्ये जमिनीत पावसाचे पाणी झिरपण्याचे प्रमाण कमी असून, तुलनेत पाण्याचा उपसा अधिक असल्याने पाण्याची पातळी खालावत चालली आहे. त्यात वाढ करण्यासाठी हिंगणा पंचायत समिती प्रशासनाने तालुक्यातील 40 ग्रामपंचायतींच्या शिवारात प्रत्येकी दोन अशाप्रकारे 80 बंधारे बांधण्याचा संकल्प केलेला आहे. सावंगी देवळी ग्रामपंचायत प्रशासनाने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत श्रमदानातून एका वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली आहे. गटविकास अधिकारी संदीप गोडशेलवार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागाच्या मदतीने या बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. त्याच्या निर्मितीसाठी सावंगी देवळी येथील शेतकऱ्यांसह नागरिकांनी व सर्व ग्राम पंचायत अधिकारी, पंचायत समिती अधिकारी कर्मचारी, ग्राम पंचायत सदस्य व कर्मचारी श्रमदान केले. या बंधाऱ्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढली व त्या पाण्याचा विहिरींच्या रूपाने सिंचनासाठी फायदा होईल, असा विश्वासही शेतकऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी सरपंच मयुरी हर्षल सोनवाने, उपसरपंच सविता वडमे, गटविकास अधिकारी संदीप गोडशेलवार, सहायक गटविकास अधिकारी, सुशांत गाडेवार, सर्व ग्रा.प. सदस्य, कृषी अधिकारी ओ. के. मेश्राम, विस्तार अधिकारी (पंचायत) शेषराव चव्हाण, जीवन देशमुख, विस्तार अधिकारी (कृषी) नंदकिशोर खंडाळ, विद्या डोये, विस्तार अधिकारी आरोग्य भारध्वाज, सर्व ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

## महत्वाचे

## प्रज्ञाज्योत बुद्ध विहार येथे मार्गशीर्ष पौर्णिमा साजरी

**नागपूर :** मार्गशीर्ष पौर्णिमा निमित्त प्रज्ञा ज्योत बुद्ध विहार, भीम चौक जरीपटका येथे आयोजित करण्यात आला. सर्वात प्रथम आलेल्या सर्व मान्यवरांनी तथागत गौतम बुद्धांच्या व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पवंदन व माल्यार्पण केले. नंतर बुद्ध वंदना घेण्यात आली. कार्यक्रमात मुख्य वक्ता सखाराम मंडपे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलकंठ बहादुरे होते. विचार मंचावर विशेष आमंत्रित सी. एम. चव्हाण होते. कार्यक्रमात मुख्य वक्ता सखाराम मंडपे यांनी मार्गशीर्ष पौर्णिमेला कोणत्या घटना तथागत बुद्धांच्या जीवनात घडल्या त्याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यात त्यांनी सांगितले की तथागत बुद्धांनी द्वेष करणाऱ्या व्यक्तीला सुद्धा करूणा व मेत्ताद्वारे आपलेसे केले. तसेच रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यात कोणती साम्यस्थळे आहेत. याबद्दल अधिक महत्वपूर्ण अभ्यासू माहिती दिली. त्यांचा एकूण सार म्हणजे दोनच राजे इथे गाजले. कोकण पुण्य भूमीवर! एक त्या रायगडावर, एक त्या महाडच्या चवदार तळ्यावर! कार्यक्रमाचे संचालन मिलिंद मेश्राम (सचिव) यांनी सुंदररीत्या केले. आभार भगवान निमगडे (कोषाध्यक्ष) यांनी मानले.

## रमाई बुद्ध विहार रमाईनगर श्रीनगर येथे मार्गशीर्ष पौर्णिमा साजरी



**नागपूर :** मार्गशीर्ष पौर्णिमे निमित्त रमाई बुद्ध विहार रमाई नगर, श्रीनगर, नागपूर येथे कार्यक्रम आयोजित केला. तथागतांच्या चरणी पुष्प अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण पुष्पा कांबळे यांनी केले. त्यानंतर मार्गशीर्ष पौर्णिमेचे महत्व समजावून सांगितले. त्यानंतर वर्षावासात घेतलेल्या स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके वितरीत करण्यात आली. सर्व स्पर्धकाचे सर्वांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. वैयक्तीकरित्या महेशकर यांनी 5 विजेत्यांना पारितोषिके दिली. विजेत्यांना जेष्ठ मान्यवर आदिनाथ शामकुळे, नागेश बुरबुरे, विठ्ठलराव झांबरे, बाबूजी पाटील, विनोद पानतावने, पाटील, इत्यादींच्या हस्ते पारितोषिके दिली. अपेक्षा शामकुवर हिने विजेते व स्पर्धेत भाग घेणाऱ्यांचे आभार मानले. विशेष पुष्पा कांबळे व शशी शामकुवर आणि सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले. मार्गशिर्ष पौर्णिमेनिमित्त्य खिरदान व विहारास दान तेजस्विनी नागेश बुरबुरे आणि विनोद पानतावणे यांनी वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ फलदान केले, तर पुष्पा योगीनाथ शेंडे यांनी सुद्धा विहारास दान दिले. या सर्वांचे अभिनंदन दिलीपकुमार लेहगांवकर यांनी केले. या कायक्रमाच्या स्थानी आदिनाथ शामकुवर हे होते.

# नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये धोबी समाजाचे राज्यस्तरीय साखळी धरणे



**नागपूर :** हिवाळी अधिवेशनामध्ये धोबी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालाजी शिंदे, संजय भिलकर, अनिल शिंदे, गोपी अन्ना चाकर याच्या नेतृत्वामध्ये 8/12/2025 पासुन राज्य स्तरीय साखळी धरणे प्रदर्शन करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेट नुसार कुणबी जातीचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सरकार देत आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील धोबी समाजाला सुद्धा 1960 च्या आधी सि.पी. ॲन्ड बेरार राज्य (मध्यप्रदेश) मध्ये धोबी समाज अनुसूचित जातीमध्ये होता. परंतु 1960 नंतर भाषिक प्रांत रचनेनुसार मराठी भाषा बोलणाऱ्यांचे महाराष्ट्र राज्य बनले व हिंदी बोलणाऱ्यांचे मध्यप्रदेश राज्य बनले. धोबी समाज मराठी भाषा जास्त प्रमाणात बोलत असल्यामुळे महाराष्ट्रात राहीला त्या वेळेस तत्कालीन सरकारने धोबी समाजाला ओबीसी मध्ये टाकले. देशात धोबी समाज 18 राज्यामध्ये अनुसूचित जातीमध्ये येतो. परंतु त्याच देशात महाराष्ट्रात मात्र ओ बी सी मध्ये येतो. धोबी समाज अनुसूचित जातीमध्ये येण्या करीता 1960 पासुन ही लढाई लोकशाही पद्धतीने आंदोलने, मोर्चे, धरणा प्रदर्शने करुण मागणी करीत आहे. परंतु सरकारने धोबी समाजाच्या मागणीकडे लक्ष दिले नाही. धरणे आंदोलनाला यशस्वी करण्याकरीता नरेंद्र पालटकर, नारायण वानखेडे, मनिष वानखेडे, अरविंद क्षिरसागर, नितिन रामटेककर, घनश्याम कनोजिया, नितिन दौडकर, संजय चौधरी, रितेश पात्रिकर, रवि चिलाटे, राजु सेलुकर, योगेश शिरपुरकर, नितिन रामटेककर, रमेश काळे, दिपक सौदागर, मनोज कापसे, अथक परिश्रम घेत आहे.

# यशस्वी अश्लेशा रितेश सवाईथुल हिचा नागरी सत्कार



**नागपूर :** डॉ. आंबेडकर स्मृती मंडळ, गौतम नगर कामठीच्यावतीने यशस्वी रितेष सवाईथुल यांचा स्थायी कमिशन भारतीय नौसेना मधे एस एस बी द्वारा अधिकारी पदापर निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार केला. हा कार्यक्रम रमाई पार्क गौतम नगर, पोरवाल कॉलेज समोर कामठी येथे आयोजित केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष गुनरत्न तांबे होते, तर भंते नागदिपंकर, महाथेरो हे प्रमुख अतिथी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सचिन अशोक चांदोरकर, सचिव यांनी केले. यावेळी महाकारूणिक तथागत भगवान गौतम बुद्ध तसेच बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तथा माता रमाईच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यशस्वी रितेश सवाईथुल याना मंडळाकडुन शॉल, फुलगुच्छ तसेच स्मृती चिन्ह देवुन गौरन्वीत केले. तसेच यशस्वीची आई अश्लेशा यांना दिपा तांबे आणि वडिल रितेश सवाईथुल यांना मिथुन चांदोरकर, यांनी फुलगुच्छ देवुन सन्मानित केले. याप्रसंगी यशस्वीने आपला अनुभव सिलेक्षन प्रोसेस बद्दल माहीती आणि मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमामधे मिथुन चांदोरकर, गुनरत्न तांबे यांनी आपले विचार व्यक्त केले तर भंते नागदिपंकर, महाथेरो यांनी आशीर्वाद स्वरूप मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन धर्मपाल नागदेवे यांनी केले. सत्कार समारंभामधे गौतमनगरातील अनेक उपासक-उपासिका तसेच डॉ. आंबेडकर स्मृती मंडळ, गौतमनगर कामठीचे पदाधिकारी महिला मंडळ उपस्थित होते. कार्यक्रमामधे राजु गजभिये, गणेश डांगे, विजय चांदोरकर, सचिन चांदोरकर, धर्मपाल नागदेव, मिथुन चांदोरकर, रितेष सवाईफुल, अनिरूद्ध तांबे, शैलेश चांदोरकर, शशिकांत तांबे, सुबोध मेश्राम तसेच महिला मंडळ अणि गौतमनगरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बहुजन समाजाने चिकित्सक व्हावे : नरेन्द्र पाटील



**वरूड :** कोणत्याही गोष्टीची चिकित्सा न करता जेव्हा कोणतीही गोष्ट जे लोक मान्य करतात तेव्हा अश्या व्यक्ती मानसिक गुलाम असतात. भगवान गौतम बुद्ध, संत बसवेश्वर, चक्रधर स्वामी, संत कबीर, संत नामदेव, संत तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी हे आणि यांचेसारखे महापुरुष मानसिक गुलामीतून मुक्त झाले आणि त्यांनी समाजाला देखील मुक्त केले. म्हणून आपण सर्वांनी चिकित्सक झाले पाहिजे असे विचार संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. ते संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे वतीने आयोजित प्रबोधन यात्रा निमित्त वरूड पासून 10 की.मी. अंतरावर असलेल्या बेनोडा या गावातील प्रबोधन सभेत बोलत होते. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक अशोक सरस्वती म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानसिक स्वातंत्र्य असलेले लोक खरे स्वातंत्र्य आहेत असे मानणाऱ्या पैकी होते. त्यासाठी त्यांनी लोकांना बुद्धीवादी व्हा, तर्कनिष्ठ व्हा आणि मानसिक गुलामीतून मुक्त व्हा असा उपदेश केला. त्या करीताच त्यांनी बुद्ध, फुले, कबीर यांना गुरू मानले असे त्यांनी प्रतिपादन केले. सभेच्या अध्यक्षस्थानी बुद्ध विहाराच्या अध्यक्षा सीमा ब्राम्हने या होत्या. यांनी देखील मार्गदर्शन केले. या प्रसंगी गौतम झाडोदे, राहुल बासुंदे यानी आपले विचार व्यक्त केले. सभेचे प्रास्ताविक आश्रमाचे सचिव शंकर ब्राम्हणे यांनी केले. संचालन दीपिका दहीवाडे, आभार प्रदर्शन सुषमा वावरे यांनी केले.



# जाती अंतासाठी प्रबोधन आवश्यक : अशोक सरस्वती बौद्ध

**आष्टी :** जाती संस्था जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत श्रमिक संघटित होत नाही. त्यामुळे तो संघर्ष करण्याची क्षमता गमावून बसतो. म्हणून तो राजकीय, सामाजिक आणि आर्थिक गुलामीत जगत आहे. मानसिक गुलामी त्याला जाती अंत करू देत नाही. म्हणून मानसिक गुलामी हीच सर्व गुलामीची जननी आहे हे जाणून ते नष्ट करण्यासाठी समाजातील खालच्या घटकाचे प्रबोधन आवश्यक आहे असे प्रतिपादन 31 व्या प्रबोधन यात्रे प्रमुख मार्गदर्शक अशोक सरस्वती बौद्ध यांनी केले. ते साहुर येथील प्रबोधन सभेत बोलत होते. या सभेत संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, सचिव शंकर ब्राम्हने, राहुल बासुंदे यांनी आपले विचार मांडले. संचालन आणि आभार प्रदर्शन गुलाबराव नेवारे यांनी केले.

# बुद्धरत्न विहार नवीन बगडगंज येथे मार्गशीर्ष पौर्णिमा



**नागपूर :** 'कही हम भूल न जाये' या उपक्रमांतर्गत बुद्धरत्न विहार नवीन बगडगंज, नागपूर येथे मार्गशीष पौर्णिमेचा उत्सव झाला. बुद्धरत्न विहार महिला संघ नवीन बगडगंज तर्फे उपासिकांकरिता भोजनदानाचा कार्यक्रम पार पडल्यावर शुभांगी अजय मानवटकर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व महिला संघाच्या सदस्यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. प्रबुद्ध समाज समितीचे अध्यक्ष पी. आर. धोंगडे यांचे अध्यक्षतेखाली हा प्रबोधनाचा कार्यक्रम घेतला. विठ्ठलवाडीचे शाखा व्यवस्थापक वासुदेवराव डोंगरे यांनी सभेचे संचालन केले. त्यांनी आपल्या भाषणात खापऱ्या महार व कृष्णा महारची गोष्ट सांगितली. आपला समाज कृष्णा महारप्रमाणे स्वाभिमानी व्हायला हवा असे ते म्हणाले. दुसरे वक्ते कुशन लिंगायत यांनी पंचशील पालन करण्यासंबंधी प्रबोधन केले. ते पुढे म्हणाले की किमान एक तरी शील पालन केले पाहिजे. त्यांनी एक शील पालन केलेल्या चोराची गोष्ट सांगितली. गुलचंद रंगारी बौद्ध यांनी वर्तमान समाजातील धार्मिक, सामाजिक अनास्था व ती कशी दूर करता येईल याविषयी सखोल मार्गदर्शन केले. सभेचे अध्यक्ष पी. आर. धोंगडे यांनी चार आर्य सत्य, आर्य अष्टांगिक मार्ग, स्रोतापन्न, सकदागामी, अनागामी व अर्हत यासंबंधी विचार व्यक्त केले. कुशन लिंगायत यांनी सर्वांचे आभार गीत गावून केले. धम्मपालन गाथेने या कार्यक्रमाची सांगता झाली. शेवटी खीरदानचा कार्यक्रम पडला. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी महिला संघाचे सदस्य शुभांगी अजय मानवटकर, आशा विनोद मानकर, शीला पाटील, विमला लोखंडे, रेखा मूल, इंद्रकला मुल, आशा खोब्रागडे, कृष्णा नितनवरे, शीला मानवटकर, अनुसया सनकाळे, दमयंती फुलझेले, सुजाता ढोणे, सीता तभाणे, ज्योती मानकर, सरिता हाडके, छाया राहाटे, हिरा गवई व साधना संजय हाडके इत्यादींनी परिश्रम केले.


## दि शे. का. ॲन्ड बुद्धिस्ट पेन्शनर्स असोसिएशन

221-अ, 'करुणा सांस्कृतिक भवन' बजाजनगर, नागपूर-440 010.
(नोंदणी क्र. 43/81 ● ट्रस्ट क्र. एफ-2903/नाग.)

:: वार्षिक सर्वसाधारण आमसभा सूचना पत्र ::

संस्थेची सन 2024-25 ची वार्षिक सर्वसाधारण आमसभा **गुरूवार, दि. 25-12-2025 ला सकाळी ठीक 11.00 (अकरा) वाजता** ''करूणा सांस्कृतिक सभागृह''221-अ, बजाज नगर, नागपूर-10 येथे आयोजित केली आहे.

**सभेत खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात येतील.**

1) दि. 23-03-2025 ला झालेल्या सर्वसाधारण आमसभेच्या कार्य वृत्तांताचे वाचन व मंजूरी.
2) सन 2024-2025 मधील वार्षिक कार्य वृत्तांताचे वाचन व मंजूरी.
3) दि. 1-4-2024 ते 31-3-2025 मधील चार्टर्ड अकाउन्टन्ट यांनी तपासलेला आय-व्यय, जमाखर्च व ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे.
4) सन 2025-2026 च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
5) सन 2025-26 करीता ऑडीटरची नेमणुक करणे.
6) अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

**या सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.**

**:: विशेष सूचना ::**

1) गणपूर्ती अभावी सभा स्थगित झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासा नंतर सभेचे कामकाज पुन्हा सुरू होईल तेंव्हा या सभेला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
2) सभासदांना लेखा परिक्षित आय-व्यय, जमा-खर्च आणि ताळेबंद पत्रकाबाबत अधिक माहिती हवी असल्यास किंवा एखादा विषय सभेत चर्चेसाठी पाठवावयाचा असल्यास तो लेखी स्वरूपात संस्थेकडे दि. 15-12-2025 ला दुपारी 1.00 वाजे पर्यंत संस्थेच्या कार्यालयात द्यावा किंवा मोबाईल क्र. 9421806219 यावर दुरप्रसारण प्रणाली द्वारे पाठवावा.
3) **सभेला येतांना अहवाल पुस्तक आणि ओळखपत्र सोबत आणावे.**
4) पत्र व्यवहाराचा पत्ता आणि दूरध्वनी क्र. बदलला असल्यास संस्थेला कळवावे.
5) **सहभोजनाची व्यवस्था वर्गणीवर राहील. (वर्गणी प्रति व्यक्ती रु. 100=00)**

नागपूर
दि. : 26/11/2025

आपला
डब्ल्यु. एल. फुसाटे,
सचिव





उठ मातंगा जागा हो.. संघर्षाचा धागा हो...

## धरणे आंदोलन हिवाळी अधिवेशन 2025

(८ डिसेंबर ते १९ डिसेंबर)

समाजाच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी एकजुटीने,जोरकस आंदोलन करण्याचे सर्व समाज बांधवांना

## विनम्र आवाहन

### मातंग समाजाच्या प्रमुख मागण्या

१) न्यायमुर्ती अनंत बदर समितीच्या अंतिम अहवालाच्या अधिन राहून महाराष्ट्रात अनुसुचित जाती प्रवर्गात अ, ब, क, ड उपवर्गीकरण करण्याचा अध्यादेश त्वरित संमत करावा.
२) अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व जातींची जनगणना प्राधान्य तत्वांवर पुर्ण करण्यात यावी.
३) अण्णाभाऊ साठे रिसर्च व ट्रेनिंग इंस्टीटयुट (आर्टी) चे विभागीय स्तरावर व जिल्हा स्तरावर कार्यालय स्थापन करावे.
४) साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करावा..
५) अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील १० लाखाच्या कर्ज रकमेपर्यंत 'सरकारी नोकर जमानतदार' असण्याची अट विनाविलंब रद्द करावी. महामंडळातील रिक्त पदांची त्वरित भर्ती करावी व त्यासाठी मांतग समाजातील युवकांना प्राधान्य द्यावे.
६) सामाजिक न्याय विभागाच्या अनुसुचित जाती साठी असलेल्या सर्व योजनांमध्ये मातंग समाजातील लाभार्थ्यांसाठी किमान २५ टक्के आरक्षणाची तरतूद करावी.
७) कर्मविर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत मातंग समाजातील लाभार्थ्यांसाठी किमान २५ टक्के आरक्षणाची तरतूद करावी.
८) रमाई आवास योजनेअंतर्गत शासन अनुदानामध्ये शहरी भागासाठी ५ लक्ष रू. तर ग्रामिण भागासाठी ४ लक्ष रू. अशी वाढ करावी.
९) वृद्ध कलाकार मानधन योजनेमध्ये मातंग समाजातील बँड कलाकारांचा समावेश करावा.
१०) पोलीस विभाग अंतर्गत बँड पथक भर्तीमध्ये मातंग समाजातील युवकांना प्राधान्य द्यावे.
११) प्रत्येक तालुका स्तरावर 'अण्णाभाऊ साठे भवन' ची स्थापना करावी व त्यासाठी निधिची तरतूद करावी.

विनीत : महाराष्ट्र मातंग एकीकरण समिती, नागपूर


बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

- **प्रवीण गायकवाड**
09850301528
विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड, वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी
- **निलेश कांबळे**
मो नं. 94236 34976
**एरिया :** उंटखाना, दत्तात्रयनगर, सुभेदार ले आउट , म्हाळगीनगर
- **सुनील कुंभारे**
मो नं. 98238 94329
- **विशाखा नारायणे**
मो नं 99602 41648
**एरिया :** जोगी नगर , काशी नगर, धाडीवाल ले आऊट, सुयोग नगर, रानवाडी
- **प्रमोद चहांदे**
मो नं 9273170800
जोगी नगर, धाडीवाल ले आऊट, संयोग नगर, नरेंद्र नगर,
- **चंदू नगरारे**
मो नं. 9975968852
शताब्दी नगर, काशी नगर, अभयनगर, जयवंतनगर, भीम नगर, जोगी नगर.
- **निलेश वालदे**
मो.नं.9764772886
मोहन नगर. गौतम नगर, गड्डीगोदाम परिसर
- **मसारकर**
918080158604
धाडीवाल ले आउट.
- **लिना विनोद भोवते**
मो.नं. 9021770694
इंदोरा, जरीपटका, भीमचौक, नाराघाट.
- **प्रविण राजाराम ठवरे**
मो.नं. 9372331798
मॉडेल टॉऊन, बेझनबाग.
- **रितेश अनिल बोदेले**
मो.नं. 9511843694
WCL पॉव ग्रीड
- **गगन प्रताप नाहारकर**
मो.नं. 8793389936
मेकोसाबाग, नवा नकाशा.
- **प्रमोद बागडे**
मो.नं. 9764973627
इंदोरा, सुगत नगर.
- **बी प्रकाश राव**
मो.नं. 9022621075
भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.
- **पुष्पीत कराडे**
मो.नं. 8055416108
वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.
- **राहुल राजकुमार जांबुळकर**
मो.नं. 9673392025
नारी.
- **श्रीकांत वासनिक**
मो.नं. 9767624345
काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर, रमा नगर, जय भिम नगर.
- **मंगेश शंभरकर**
मो.नं. 9970258703
नरेंद्र नगर, सुयोग नगर, भिम नगर, शताब्दी नगर.
- **निळकंठ वि. जवादे**
मो.नं. 9623773365
रमा नगर, मनीष नगर.
- **विनोद कृष्णराव डूले**
वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, . 7447767922
- **आशिष थुल**
9423400956
धरमपेठ, आंबेडकरनगर
- **राम मानवटकर**
8626037360,
न्यू. मनिष नगर
- **अमन शरणागत**
9575673895
टेकअप सिटी , दिघोरी, बहादूरा पेपर एजन्सी,
- **राहुल आठवले**
8485854398
संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान, काटोल रोड, नागपूर
- **दिगाबर पांडुरंग वासनिक**
9561974131
454- नविन सुभेदार ले आऊट
दिनेश पेपर एजन्सी
- **गौतम भीमराव मेश्राम**
जयवंत नगर , अभयनगर
9975941830
- **स्वप्निल वाढबुधे**
न्यू अमर नगर, शेषनगर, विठ्ठल नगर, सिद्धेश्वरी नगर, चक्रपाणी नगर, गजानन नगर.
मो. 96046 54382
- **योगेश मेहर**
टेक ऑफ सिटी, बहादुरा परिसर
मो. 919552971648
- **दिनेश टेंभुर्णे**
इंदोरा, लष्करी बाग, बेझनबाग, पी. डब्ल्यू एस. कॉलेज परिसर
मो. 8806511702
- **गजानन गायकवाड**
कार्तिक मार्टड़ , बेसा सेंटर, पेट्रोल पंप जवळ, बेसा
9921552488
- **राजेश नंदनवार**
राहुलनगर, सोमलवाडा
मो.न. 9850335018
- **विनायक हाडके**
प्रतापनगर
मो.न.9545750757
- **शैलेश माटे**
जयताळा, त्रिमूर्ती नगर, अंबाझरी मो. 9767987363
- **संदिप टेंभुरकर**
समता नगर, नारा रोड नागपूर
मोबाईल. 8657565247

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648